१९८०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९६३

REFBK-0017964
REFBK-0017964

— रामचंद्र नारायण नातू
बी. ए.

१५८६४
काव्य
५६३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रगति वाचनालय
पु. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........................ वि: ३(०४)
क्रमांक ५६३ ... ३१।१२।६०

# पाउलवाट

REFBK-0017964
REFBK-0017964

—रामचंद्र नारायण जातू

बी. ए.

प्रकाशक
वि. र. बाम
रामकृष्ण बुक-डेपो
मुंबई ४.

— सर्व अधिकार लेखकाचे स्वाधीन —

मुद्रक
लक्ष्मण सखाराम केळकर
जनार्दन सदाशिव लि. मुद्रणालय,
३९४ सदाशिव पुणे २.

तर्कशुद्ध बौद्धिक विवेचन आणि अस्पष्ट मधुर भावना

ज्ञानलालसा आणि लालित्यलोलुपता

‘ अस्पृष्टांचा प्रश्न ’ आणि ‘ उपेक्षितांचे अंतरंग ’

यात असणारा विरोध हा खराखुरा विरोध नसून

एक अत्यंत रम्य असा विरोधाभास आहे

हे मला आपल्या व्यक्तिमत्वाच्या

आदर्शानं पटवून देणाऱ्या

**“ बापूंना ”**

( प्रा. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए. )

सप्रेम समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम........................ वि: ...३।७२... अमा.
क्रमांक .........२६३......... नों. दि. २२।६।७०

# मनोगत

ग्रंथ संग्रहालय ठाणे

माझ्या मनोरचनेच्या घटकांचे निरीक्षण करू लागलो तर त्यात दोन प्रवाह मला दिसून येतात. एक म्हणजे ज्ञानासक्ती आणि दुसरा म्हणजे सौंदर्यासक्ती. यातल्या ज्ञानासक्तीमुळे मी 'जगाचा इतिहास' लिहिला, आणि सौंदर्यासक्तीमुळे जन्माला आलेली 'पाउलवाट' मी आज रसिकांपुढे ठेवीत आहे.

मात्र सर्वांना मी आधी जगाच्या इतिहासाचा लेखक आणि नंतर 'पाउलवाट' रचणारा जशा क्रमाने माहीत झालेला असलो तरी माझ्यासारख्या 'कवि' प्राण्याच्या डोक्यात हे इतिहासलेखनाचे वेड कसे शिरले याचे त्यांच्यापैकी काहीजणांना आश्चर्य वाटले. या त्यांच्या आश्चर्याचा परिहार करणारी उपपत्ति मी माझ्या 'कोळ्याचे जाळे' या दैनंदिनीसारख्या विचार-मालिकेत लिहिली होती ती येथे देतो.

> "पुष्कळजण माझ्यासारख्या 'कवि' प्राण्याच्या डोक्यात हे इतिहासलेखनाचे वेड कसे भरले याबद्दल आश्चर्य प्रकट करतात. पण शोधाच्या पाठीमागे वेड्यासारख्या लागलेल्या एडिसनच्या प्रयत्नात देखील मला हृदयात घुटमळणारे एक अपूर्व काव्य दिसते त्याला मी काय करू ? बारिकसारीक सौंदर्यसुद्धा हुडकून काढून त्यांना वाङ्मयात अमर करू पहाणाऱ्या

> कवीने, जगाने बेफाटपणे उधळलेली आणि माणसांच्या नसानसातून प्रत्यक्षात सळसळलेली सौंदर्ये क्षणभर कौतुकाने का पाहू नयेत? वाळवंटी विखुरलेल्या रंगीबेरंगी खड्यांकडे त्याने पहावेच. पण क्षितिजाच्याही पलीकडे पसरलेल्या सागराचे सौंदर्यसुद्धा त्याने आसावलेल्या डोळयांनी कौतुक भरून घेऊन का पाहू नये?"
>
> —३१ एप्रिल १९४०.

पण ज्ञानासक्ती आणि सौंदर्यासक्ती यांच्यात काहीतरी विरोध असला पाहिजे असे उगीचच मला वाटत असे. 'तर मग माझ्या स्वतःच्या मनोरचनेतच हा विरोध कसा काय दिसतो?' या गोष्टीकडे त्यावेळी माझे लक्ष गेले नाहीं. पुढें 'अस्पृष्टांचा प्रश्न' हे तर्कपरिप्लुत पुस्तक लिहून महाराष्ट्राला सुपरिचित असणाऱ्या प्रा. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग' हे भावमधुर पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याने माझ्या ध्यानांत आले की ज्ञानासक्ती व सौंदर्यासक्ती यांच्यात पुष्कळांना जो विरोध वाटतो तो खराखुरा विरोध नसून एक अत्यंत रम्य असा विरोधाभास आहे; एकाच व्यक्तीच्या मनःकोषात बुद्धी व भावना, लालित्य व गांभीर्य, ज्ञानसक्ती व सौंदर्यासक्ती या दोन गोष्टी एकत्र नांदू शकतात.

पण मध्यंतरी माझ्या मनांत डोकावून गेलेला हा चुकीचा रूढ-संकेत इतरही समंजस माणसांच्या मनात अधूनमधून डोकावत आहे असे दिसते. कारण कोणी

विद्वानांनें आपल्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू जी सौंदर्यपिपासु भावना तिचा आविष्कार करणारे असे काही लिहिले की अजूनही कोणाकोणाला कळमळू लागते. इतके की या दुसऱ्या बाजूचे स्वागत करण्या-ऐवजी, “ अहो ! मराठी वाङ्मयात हे काहीतरी विकृत; अनिष्टपरिणामसूचक वातावरण निर्माण होत आहे ” अशी भ्रांत हाकाटी ते सुरू करतात. बुद्धि आणि भावना, लालित्य आणि गांभीर्य, ज्ञानासक्ती व सौंदर्यासक्ती यांच्यात काहीएक मूलभूत विरोध आहे या चुकीच्या रूढ–संकेताचा पगडा स्वतःला ‘ पुरो-गामी ’ म्हणवून घेणाऱ्या टीकाकारावरही जबर असतो. बुद्धिचे उगमस्थान मेंदूत आहे आणि भावनांचे उगम-स्थान हृदयात आहे हे ते इतक्यांदा घोकत असतात की या दोघांचा प्रीतिसंगम ‘ मानवी मन ’ नावाच्या अतींद्रिय वस्तूत होतो ही गोष्ट ते पार विसरून जातात.

या मानवी मनाचा विकास निसर्गाच्या व मानवी जीवनाच्या अवलोकनाने होत असतो. ज्या निसर्गाच्या व मानवी जीवनाच्या अवलोकनाने हा विकास होतो असे म्हटले, त्या निसर्गाचे व मानवी जीविताचे आवाहन सर्व मानवी मनाला असते. ते केवळ ‘ बुद्धि ’ या मानवी मनाच्या एका भागालाच असते किंवा ‘ भावना ’ नांवाच्या दुसऱ्या भागालाच असते असे थोडेच आहे ? पन्हाळगडच्या पठाराची हाक काव्यरूप पुष्पसंपदा गोळा करून आणणाऱ्या गोविंदाग्रजांच्या

भावनेला असते आणि सह्याद्रीच्या पोटातील लोखंड उकरून काढणाऱ्या शास्त्रज्ञांच्या बुद्धीला मात्र ती नसते असे कसे म्हणता येईल? धबधब्याच्या जलक्रीडेचे आवाहन यशवंतांच्या भावनेला असते; पण त्यातून विद्युच्छक्ती उत्पन्न करणाऱ्या शास्त्रविदांच्या बुद्धीला मात्र ते नसते असे म्हटले तर ते सुयुक्त ठरेल काय? जे मानवी जीवित, आपले अवलोकन करणाऱ्या मानव-जातीतून 'मनुस्मृति'कारासारखा समाजशास्त्री निर्माण करते ते जीवित तेथूनच कालिदास उत्पन्न करीत नाही काय?

आपल्याकडे अधुनमधून येणाऱ्या चिनी फेरीवाल्या जवळ टीपॉइजवर घालावयाचे काही एका विशेष प्रकारचे रेशमी रुमाल मिळतात. त्यांची गंमत अशी असते की, त्यांच्या पोताचा रंग एका बाजूने पाहिले असता शेवाळी दिसतो. पण दुसऱ्या बाजूने पाहिले की त्याच रुमालाचा रंग सोनेरी आहे असा भास होतो. मानवी जीविताची मौजही अशीच आहे. एका बाजूने तिकडे पाहिले तर त्यातले गांभीर्य आणि बुद्धि-सौंदर्य पाहून मन स्तिमित होऊन जाते; तर दुसऱ्या बाजूने पाहिले असता त्यातले लालित्य व भावसौंदर्य पाहून मनाला मोठा आल्हाद वाटतो.

आता एकाच माणसाला, एकाचवेळीं या मानवी-जीवितरुप रेशमी रुमालाचे दर्शन निरनिराळ्या दृष्टि-कोनातून होणे अशक्य असते हे खरेच. तरीपण निर-

निराळ्या वेळी त्याचें निराळ्या बाजूंनी दर्शन घेण्याची वासना एकाद्याच्या चित्तात उद्भवली तर ते स्वाभाविकच नाहीं काय ? जगज्येत्या अॅलेक्झँडरच्या मनावर जशी ऑरिस्टॉटलच्या बुद्धिवैभवाची भुरळ होती तसा महाकवी पिंडारच्या .भावसौंदर्याचाही तो अतिशय चहाता होता हे खरे आहे ना ? जुने रोमन साम्राज्य पुनः उभविण्याच्या कामात मुसोलिनी आपले बुद्धिसर्वस्व खर्च करीत असे तरी अधुनमधून फिडल वाजविण्याचाही त्याला नाद होता हे विसरून कसे चालेल ?

कधी बुद्धीच्या मागे आपल्या मनाचे पाश गुंतवावे तर कधी भावनेच्या मागे वेडावल्यासारखे धावत जावे ही माणसाची वासना नुसती स्वाभाविक आहे एवढेच नव्हे तर बुद्धि व भावना यांच्यातील या पाठशिवणीच्या खेळाची माणसाच्या मनाला नेहमीच जब्बर भुरळ पडत आलेली आहे. माणसाची पिंडरचनाच कायमपणाला पारखी आहे. एकसारखे बुद्धीच्याच पाठीमागे लागण्यात किंवा एकसारखे भावस्वप्नात मुरकटून पडण्यात माणसाला राम वाटत नाही. मानवी जीविताच्या हिंदोळ्यावर सुखःदुखांचे, लालित्यगांभीर्यांचे आणि बुद्धिभावनेचे झोके खाण्यात माणसाला परमसुख वाटते. 'नको नको रे मज कायम पण' हे माणसाच्या चंचल जीवनातले स्थिर सूत्र असते.

आणि जरा काळजीपूर्वक पाहिले असता मानवाच्या या चंचल प्रकृतीतूनच मानवी जीवनाचे मोठे

चेच देखणेपण म्हणजे अवलोकनशक्ती आणि त्याहूनही विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या निसर्गाचे व मानवी जीविताचे अवलोकन करावयाचे त्या निसर्गाशी व मानवी जीविताशी समरस होऊन ते करण्याची शक्ती निसर्गाच्या व मानवी जीविताच्या मानाने स्वाभाविकपणे केव्हाही कितीतरी अपुरीच राहणार. स्वाभाविकपणेच त्यातली कुठली जी एक बाजू मनाला अधिक रुचेल व पचेल तिकडे प्रत्येकाने झेपावत जावे हे युक्तच आहे. "माझ्या मनाला बुद्धीची विशेष भुरळ आहे व त्यामुळे माझ्या मनातील भावनेच्या बाजूला शब्दरूपाने वाट देण्याच्या कामात मी काहीसा विकल आहे" अथवा "माझ्या मनाला भावसौंदर्याचे आकर्षण फार आहे; व त्यामुळे बौद्धिक क्षेत्रात मी तितकासा समर्थ नाही" असे प्रांजळपणाने कबूल करण्यास कुणालाही कसलाही अपमान वाटण्याचे काहीच कारण नाही. कारण आपणा सर्वांची स्थिती तारतम्याने तीच असते. पण म्हणून जर कोणाला मानवी मनाच्या या दोनही अंगात आलटून पालटून व कमी जास्त प्रमाणात का होईना पण विहार करण्याची शक्ती व इच्छा असली व निसर्गदत्त सामर्थ्याच्या बळावर बुद्धि व भावना या मानवी मनाच्या दोनही प्रांगणात त्याने थोडाफार विहार केला तर त्यामुळे एवढे ब्रावचळून जाण्याचे व 'पन्नाशीच्या आसपास असलेल्या विद्वानांनी गंभीरच ग्रंथ लिहावे'

न्यहार विणीचे पाटाव तयार होते हे खरे नाही काय ? बुद्धीच्या उत्कर्षानेच भावनेचा विकास होतो व भावनेच्या भुलावणीनेच बुद्धीचा रथ पुढे पुढे नेला जातो हे सत्य जरा काळजीपूर्वक पाहिले तर आपल्याला खचित पटेल. आपल्या प्रयोगशाळेत तासन् तास रमत बसणाऱ्या एडिसन व मार्कोनी यांच्या बुद्धिमत्तेतूनच फोनोग्राफच्या व रेडिओच्या रससौंदर्याची लयलूट साऱ्या धरित्रीवर वारेमाप उधळली गेली ही घटनाच किती उद्बोधक आहे नाही ?

पण तरीही लालित्य व गांभीर्य आणि बुद्धि व भावना यांच्यात काहीतरी मूलभूत विरोध आहे असा चुकीचा रूढ–संकेत पुष्कळांच्या मनःकोषात अगदी खोलवर मूळ धरून बसलेला दिसतो. याचे कारण पाहू जाता असे दिसेल की बुद्धि व भावना यांच्या पाठशिवणीत त्यातले भावनेचे तांडव काहीजणांच्या मनःप्रकृतीला विशेष रुचते, तर बुद्धीची तेथे झालेली चमचम काहीजणांच्या मनाला विशेष भुरळ पाडते. बुद्धि व भावना यांच्यामधील व्यक्तिगत आवडीचा मानवी मनाचा तराजू बहुधा या ना त्या बाजूला झुकलेला असतो. इतका की यापैकी कुठल्या तरी एकाच बाजूला काहीजण आपल्या मानस-मंदिरांत पुनः पुनः उत्थापन देतात व दुसऱ्या बाजूला तेथे अगदी क्वचित प्रवेश मिळतो.

पण यातही काही चूक नाही. कारण आपणा सर्वां-

चेच देखणेपण म्हणजे अवलोकनशक्ती आणि त्याहूनही विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या निसर्गाचे व मानवी जीविताचे अवलोकन करावयाचे त्या निसर्गाशी व मानवी जीविताशी समरस होऊन ते करण्याची शक्ती निसर्गाच्या व मानवी जीविताच्या मानाने स्वाभाविकपणे केव्हाही कितीतरी अपुरीच राहणार. स्वाभाविकपणेच त्यातली कुठली जी एक बाजू मनाला अधिक रुचेल व पचेल तिकडे प्रत्येकाने झेपावत जावे हे युक्तच आहे. "माझ्या मनाला बुद्धीची विशेष भुरळ आहे व त्यामुळे माझ्या मनातील भावनेच्या बाजूला शब्दरूपाने वाट देण्याच्या कामात मी काहीसा विकल आहे" अथवा "माझ्या मनाला भावसौंदर्याचे आकर्षण फार आहे; व त्यामुळे बौद्धिक क्षेत्रात मी तितकासा समर्थ नाही" असे प्रांजलपणाने कबूल करण्यास कुणालाही कसलाही अपमान वाटण्याचे काहीच कारण नाही. कारण आपणा सर्वांची स्थिती तारतम्याने तीच असते. पण म्हणून जर कोणाला मानवी मनाच्या या दोनही अंगात आलटून पालटून व कमी जास्त प्रमाणात का होईना पण विहार करण्याची शक्ती व इच्छा असली व निसर्गदत्त सामर्थ्याच्या बळावर बुद्धि व भावना या मानवी मनाच्या दोनही प्रांगणात त्याने थोडाफार विहार केला तर त्यामुळे एवढे ब्रावचळून जाण्याचे व 'पन्नाशीच्या आसपास असलेल्या विद्वानांनी गंभीरच ग्रंथ लिहावे'

व ‘ पौत्रांनी मांडीवरच लोळावे ’ अशी पोरकट विधाने सरसकटपणे करण्याचे कारण काय ? हा ज्याच्या त्याच्या मनःसामर्थ्याचा प्रश्न आहे.

अर्थात कुणाकुणा महाभागांना लालित्य व गांभीर्य ही परस्परापकर्षक आहेत असेच वाटत राहिले तर तसे वाटण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. मला मात्र अजून तरी तसे वाटत नाही एवढेच मी म्हणतो.

माझ्या मनात ज्ञानासक्ती कशामुळे उद्‌भवली हे सांगण्याचे हे स्थळ नव्हे. पण माझ्या मनोरचनेची दुसरी बाजू जी सौंदर्यासक्ती तिचा विकास कसकसा झाला व विशेषतः त्यातून ‘पाउलवाट’ कशी जन्मास आली हे येथे सांगितले तर ते विषयास सोडून होईल असे वाटत नाही.

सृष्टीतील बुद्धिसौंदर्ये व भावसौंदर्ये आपणा सर्वांच्याच डोळ्यापुढून एकसारखी चमचमून जात असतात. पण पुष्कळदा ती चमचम आपल्या दृष्टीत भरत नाही आणि भरलीच तरी ती क्षणजीवि ठरते. माझी स्थितीही तशीच होती. वाढत्या वयाबरोबर जीविता-तील अनेक प्रकारची रससौंदर्ये माझ्या दृष्टीत हळुहळू भरू लागली होती. पण त्यांच्या अनुभूतीने क्षणभर बेचैन व्हावे आणि कालांतराने ती सौंदर्ये विस्मृतीत विरून जावी असे होत असे. ही सौंदर्ये माझ्या मनात सारखी घोळत ठेवण्याचे व फुलविण्याचे कार्य संगीताने केलेले आहे, ‘ माझा मुलगा ’ बोलपट पहावयाला

गेलो असताना त्यातील ‘ जिवलगा ! पाहू रे किती वाट ? ’ या गाण्याने माझ्या भावना अगदी वेडावून गेल्या आणि ‘जिवलगा ! वर्णू रे तरी काय ?’ ही कविता त्यातून अगदी अकल्पितपणे जन्माला आली. ‘दुष्मन’ बोलपटात सायगल आपल्या आवाजोंके दुनियाके दोस्तांना जी हाक देतो त्या हाकेने मला ‘नादलुब्ध’ बनविले आणि गडकरी स्मृतिदिनानिमित्त झालेल्या सभेत गडकऱ्यांनी ‘ वेड्या प्रेमा थांब ! ’ म्हणून प्रेमाला मारलेली हाक एकाने ज्या वेळेला गाऊन माझ्या कानात घुमविली त्या वेळेला ‘ शोधि मुशाफर गात ’ ही कविता रचली गेली. संगीताला उपमा द्यायची झाली तर मी बलुचाच्या भिंगरीची देईन.

सकाळी मंडईत भाजी आणायला जावे तो मंडईच्या परिसराला लागून असलेल्या रस्त्यावर चाकूकाऱ्यांना धार लावणारा बलुची धार लावायच्या आपल्या चाकावर पायाचा दाब देत धार लावण्याच्या कामात गर्क असलेला दिसतो. त्याने धार लावायच्या चाकाच्या पायपट्टीवर आपला पाय दाबला रे दाबला की त्या चाकाला जोडलेली सहाणेच्या दगडाची भिंगरी जोराने गिरगिरू लागते. व त्यावर तो बलुची गिऱ्हाइकांच्या बोथट चाकू कात्र्या धरून त्यांना धार लावतो.

संगीताचेही असेच आहे. जीवितात गंजून चाललेल्या भावनांना ही गेयतेची भिंगरीच धार लावते; लखलखीत करते. बलुचाच्या भिंगरीप्रमाणे संगीत

केवळ धारच लावून असत नाही. ते आणखी एक कार्य करते. दिवाळीतल्या सापाच्या कांड्यांना काडी लावली की त्यातून राखेचे साप कसे सरसर निघालेले आपणास दिसतात तसे कवीचे कवितेतील मनोगत, गेयतेची काडी लागली रे लागली की खुद्द कवीच्या व रसिकांच्या मनापुढे सपसप भरत जाते.

पण दर वेळेला संगीताच्या भिंगरीपुढे धरायला विचारांच्या चाकू-कात्र्या पाहिजेतच. नाही तर संगीताची ही भिंगरी नुसतीच गिरगिरत राहिली तर त्याचा काय उपयोग आणि नुसतीच काडी पेटवली पण ती ज्यांना लावायची त्या सापाच्या कांड्या जवळ नसल्या तर करावयाचे काय ?ही अनवस्था टाळण्यासाठी मी असे केले की कुठलाही एक बारिक पण सुंदरसा विचार सुचला की तो कोळ्याच्या जाळ्यात टिपून ठेवायचा. ‘ जगाचा इतिहास ’ लिहित असताना माझ्या मनात कितीतरी सुंदर विचार येऊन गेले. या प्रत्येक विचाराला मनात घोळवत ठेवून गेयतेच्या भिंगरीवर धार लावायला किंवा विचारांच्या त्या सापाच्या कांड्या गेयतेच्या काडीवर शिलगावयाला मला सवड नव्हती. तेव्हा मी ते ते विचार कोळ्याच्या जाळ्यात टिपून ठेवायचा उपक्रम सुरू केला. याचा फायदा असा झाला की मला सवड मिळाली तेंव्हा विविध विषयांवर अनेक प्रकारच्या कविता मला झरझर लिहिता आल्या.

मी कवि कसा झालो हे येथवर सांगितले आणि

बुद्धि व भावना ही परस्परविरोधी नाहीत तर पूरक आहेत याचे विवेचनही केले. पण एक गोष्ट मात्र येथे नमूद करून ठेवावीशी वाटते ती अशी की बुद्धी व भावना यांच्यात याप्रमाणे काही विरोध नसला तरी त्यातील मार्गक्रमणात फरक मात्र निश्चित आहे.

बौद्धिक चिकित्सेची वाटचाल रुंद अशा हमरस्त्यावरूनच होत असते. पुष्कळदा रुचिभिन्नतेमुळे या वाटचालीतली वळणे थोडीफार वेगळी होतील किंवा साध्यभिन्नतेमुळे या वाटचालीतले मार्गही अगदी भिन्न भिन्न दिशांना जाणारे असतील. पण आपले बौद्धिक विवेचन शक्य तो दोषरहित व्हावे म्हणून ही वाटचाल रुंद अशा राजरस्त्याने करणेच सोईचे असते. बौद्धिक चिकित्सेत आपली गाठ भावनेशी नसून प्रत्यक्षाशी असल्यामुळे या प्रत्यक्षाचे दर्शन शक्य तो यथारूप व्हावे आणि त्यात शक्य तेवढा वस्तुस्थितीचा विपर्यास होऊ नये यासाठी अनेक ग्रंथांचे, जमेल व अवश्य वाटेल तेवढ्या प्रत्यक्ष दर्शनाचे आणि होतील तेवढ्या अनकूल व प्रतिकूल टीकांचे साहाय्य घेणे बौद्धिक चिकित्सकाला भाग असते. स्वाभाविकपणेच बौद्धिक चिकित्सेची वाटचाल रुंद अशा राजरस्त्याने करणेच सोईचे असते.

पण जीविताच्या वाटचालीत भेटलेल्या ज्या हरतऱ्हेच्या सौंदर्यांनी आपल्या भावना हलवून सोडल्या आणि आपल्या अंगचे विविधरससौंदर्य आपणास

प्रतीत करून दिले ती सौंदर्यें श्रुतिमधुर छंदोरचनेने आणि भावमधुर शब्दसौष्ठवाने फुलवून रसिकांपुढे मांडणे एवढेच ध्येय कवीपुढे असते. स्वाभाविकपणेच सौंदर्यप्रतीतीपासून तो ती सौंदर्यें फुलवून रसिकांपुढे मांडण्यापर्यंतची वाटचाल कवीला एकट्यानेच करावी लागते. नव्हे—हा प्रवास निरुंद अशा पाउलवाटेने करणेच कविला रुचते.

याप्रमाणे मी एकट्यानेच केलेले हे मार्गक्रमण वाङ्मयरसिकांना कितपत रुचते ते सांगण्याचे काम मी विनम्रभावाने त्यांच्यावरच सोपवितो.

आपणास प्रतीत झालेली सौंदर्यें फुलवून रसिकांपुढे मांडण्याचे काम कवि करतो असे आताच म्हटले. हे फुलविण्याची अनेक साधने प्रस्तुत कवितासंग्रहात वापरली आहेत. प्रत्येक कवितेच्या प्रारंभी रसग्रहणास अवश्य वाटेल तेथे व अवश्य वाटेल तेवढी पार्श्वभूमी रेखाटलेली आहे. आणि 'उरले सुरले' या परिशिष्टात प्रत्येक कवितेचे वृत्त, छंद आणि जाती किंवा चाल, मी ज्या रागात आणि तालात त्या अभावितपणे गुंफल्या तो राग आणि ताल, त्यातील बऱ्याचशा कवितातील मूलभूत विचार ज्या कोळयाच्या जाळयात टिपले आहेत ते केव्हा टिपले याची नोंद, इतर कुठल्या प्रसंगानी त्या स्फुरल्या असल्यास त्याची नोंद, अनुवादित कवितेच्या मूळ कवितेचे व कवीचे नाव, मी स्वतःच माझ्या कवितेचे इंग्रजी भाषांतर केले

प्रतीत करून दिले ती सौंदर्ये श्रुतिमधुर छंदोरचनेने आणि भावमधुर शब्दसौष्ठवाने फुलवून रसिकांपुढे मांडणे एवढेच ध्येय कवीपुढे असते. स्वाभाविकपणेच सौंदर्यप्रतीतीपासून तो ती सौंदर्ये फुलवून रसिकांपुढे मांडण्यापर्यंतची वाटचाल कवीला एकट्यानेच करावी लागते. नव्हे—हा प्रवास निरुंद अशा पाउलवाटेने करणेच कविला रुचते.

याप्रमाणे मी एकट्यानेच केलेले हे मार्गक्रमण वाङ्मयरसिकांना कितपत रुचते ते सांगण्याचे काम मी विनम्रभावाने त्यांच्यावरच सोपवितो.

आपणास प्रतीत झालेली सौंदर्ये फुलवून रसिकांपुढे मांडण्याचे काम कवि करतो असे आताच म्हटले. हे फुलविण्याची अनेक साधने प्रस्तुत कवितासंग्रहात वापरली आहेत. प्रत्येक कवितेच्या प्रारंभी रसग्रहणास अवश्य वाटेल तेथे व अवश्य वाटेल तेवढी पार्श्वभूमी रेखाटलेली आहे. आणि ‘उरले सुरले’ या परिशिष्टात प्रत्येक कवितेचे वृत्त, छंद आणि जाती किंवा चाल, मी ज्या रागात आणि तालात त्या अभावितपणे गुंफल्या तो राग आणि ताल, त्यातील बऱ्याचशा कवितातील मूलभूत विचार ज्या कोळ्याच्या जाळ्यात टिपले आहेत ते केव्हा टिपले याची नोंद, इतर कुठल्या प्रसंगानी त्या स्फुरल्या असल्यास त्याची नोंद, अनुवादित कवितेच्या मूळ कवितेचे व कवीचे नाव, मी स्वतःच माझ्या कवितेचे इंग्रजी भाषांतर केले

असल्यास त्याची नोंद आणि रसग्रहणास प्रारंभी अनवश्यक पण शेवटी मनोरंजक वाटतील अशा टीपा दिलेल्या आहेत. ' आली गीतांची बरसात ' या तिसऱ्या कवितेचा अपवाद सोडला तर उरलेल्या सर्व कविता कालानुक्रमाने आलेल्या आहेत. पाऊलवाटे-मधल्या बहुतेक सर्व कविता अप्रकाशितच आहेत. ' जिवलगा ! वर्णू रे तरी काय ? ' नादलुब्ध ' व ' स्वप्नमाधुरी ' या तीन कविता ' परशुरामियन 'च्या अंकात प्रसिद्ध झाल्या आहेत. आणि ' ताईस ' व ' तरणा दर्यासारंग ' या कविता ' वाङ्मयशोभे 'च्या अंकात आल्या आहेत. तेवढ्या सोडल्या तर उरलेल्या सर्व कविता अप्रकाशितच आहेत.

मी अभावितपणे रागातालात गुंफलेल्या कवितांचे राग व ताल कोणचे ते सांगण्याचे काम हुजूर प्यागेतील संगीत–शिक्षक रा. ना. द. तांवेशास्त्री यांनीं केले याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. ' व्याध ' कवि-तेत शिरप्याच्या वाघबच्याशी झालेल्या झटापटीचे वर्णन सांगितल्याबद्दल सुप्रसिद्ध शिकारी रा. फडतरे यांचेही आभार मानणे अवश्य आहे आणि ' पाउलवाट ' त्वरित व सुबक छापून काढल्याबद्दल जनार्दन सदाशिव मुद्रणालयाचे मालक रा. ग. ना. जोशी हेही आभारास पात्र आहेत.

व्याध कवितेतील घटना सर्वस्वी काल्पनिक असल्या तरी ज्या पारधी जमातीतल्या जीवनक्रमाच्या

पार्श्वभूमीतून त्या निघू शकतात ती मात्र वास्तवपूर्ण आहे. माझे रसिकमित्र रा. वि. श्री. मोडक आणि रा. महादेवशास्त्री जोशी यांच्या रसग्राही टीकेमुळे अनेक ठिकाणी माझ्या कवितेला सूक्ष्म सौंदर्याचे मोल चढलेले आहे. पण त्याबद्दल त्यांचे आभार मानणे औपचारिकपणाचे ठरणार नाहीं का ? आणि ज्यांच्या अवीट आठवणींशी खेळत खेळत माझे मन ही ‘ पाउलवाट ’ चालून गेले त्यांचा तर वेगळा उल्लेख करणेही येथे अप्रासंगिकपणाचे ठरेल. कारण त्या या पाउलवाटेवरील पावलटींशी एकरूप आहेत. त्यांना वेगळे काढताच येणार नाही.

विजयादशमी १९४३. —रामचंद्र नारायण नातू

# पाउलवाट

## पाउलें


१ जिवलगा ! वर्णू रे तरि काय ? पुणे, मार्च १९३९
२ नादलुब्ध पुणे, ७ एप्रिल १९३९
३ आली गीतांची बरसात पुणे, २ डिसेंबर १९४२
४ शोधि मुशाफर गात पुणे, ७ ऑगस्ट १९३९
५ बंदिवान कवि पुणें, २३ सप्टेंबर १९३९
६ निरोप पुणे, १ नोव्हेंबर १९३९
७ बीजेची ओवाळणी पुणे, भाऊबीज १९३९
८ ही हसरी कलिका रडेल का ? पुणे ३ नोव्हेंबर १९३९
९ स्वप्न-माधुरी पुणे-पाचवड प्रवास, २४ फेब्रु. १९४०
१० महाबळेश्वर महाबळेश्वर, २४ मे १९३९
११ करि अज्ञाताचे दार खुले पुणे, १९४०
१२ अबोलीची फुले पुणे, भाऊबीज १९४०
१३ वचन मीच मोडियले ग पुणे, डिसेंबर १९४०
१४ तरणा दर्यासारंग पुणे, १८ डिसेंबर १९४०
१५ जाउ नको देउं रे वसंत दारातला
पुणे, ६ मार्च १९४१
१६ जीवना ! भंगु नको रे स्वप्न पुणे, २० सप्टेंबर १९४१
१७ ताई पुणे, भाऊबीज १९४१
१८ भावनेचे विश्व पुणे, २४ एप्रिल १९४२

१९ दीनानाथा ! तुज नाथ कोण कोण भगवंता ?
पुणे, २८ एप्रिल १९४२
२० आशेस पुणे, २० जुलै १९४२
२१ आर्ता पुणे, २४ जुलै १९४२
२२ आशा-ज्योत पुणे, १२ ऑक्टोबर १९४२
२३ वाट चाल पुणे, २८ ऑक्टोबर १९४२
२४ समजूत पुणे, भाऊबीज १९४२
२५ अशीच माझी रीत पुणे, ११ नोव्हेंबर १९४२
२६ बंध पुणे, १७ नोव्हेंबर १९४२
२७ बालिकेस पुणे, २० नोव्हेंबर १९४२
२८ संधिकाल पुणे, २४ नोव्हेंबर १९४२
२९ मानवपण पुणे, २९ नोव्हेंबर १९४२
३० सृष्टीपुढचे प्रश्नचिन्ह पुणे, ५ डिसेंबर १९४२
३१ चिमणी पुणे, ७ डिसेंबर १९४२
३२ चतुर पुणे, ९ डिसेंबर १९४२
३३ निद्रा-गीत पुणे, १९ डिसेंबर १९४२
३४ अतिस्नेही मनास पुणे, २१ डिसेंबर १९४२
३५ अहेतुक पुणे, २४ डिसेंबर १९४२
३६ विड्या पुणे, २ जानेवारी १९४२
३७ आठवण पुणे, ४ जानेवारी १९४२
३८ विश्वरूपदर्शन पुणे, ९ जानेवारी १९४३
३९ आई.ग ! पुणे, १२ जानेवारी १९४३
४० भाऊराया पुणे, १४ जानेवारी १९४३
४१ माझ्या मना पुणे, १५ जानेवारी १९४३

४२ आवाहन पुणे, २० जानेवारी १९४३
४३ कावळ्याचे शहाणपण पुणे, २४ जानेवारी १९४३
४४ डोके उठविणारे तत्त्वज्ञान. पुणे, २६ जानेवारी १९४३
४५ स्वरांनो! करू नका गलबला
पुणे, २८ जानेवारी १९४३
४६ का असा तू दूर जासी?
पाचवड, १८ फेब्रुवारी १९४३
४७ रात पळुनि चालली पुणे, २३ फेब्रुवारी १९४३
४८ बंधमोचित पोपटास कहूस, १० एप्रिल १९४३
४९ जुन्या बाजारातील ज्योतिषी
कहूस, १० एप्रिल १९४३
५० व्याध पुणे, १३ ऑगस्ट १९४३
५१ स्वतःस पुणे, ३० ऑगस्ट १९४३

# पाउलवाट

## — १ जिवलगा ! वर्णू रे तरि काय ? —

कविवर्य तांब्यांना त्यांच्या एका मित्राने एक नवीन कविता पाठवून द्या असे लिहिले असता तांब्यांनी त्याला 'मधु पिळण्या परि बळ न करी' असे उत्तर दिले. जीवनाच्या सायंकालाकडे लक्ष लागलेल्या तांब्यांच्या कवितेत "पूर्वी बळ होते; पण आता माझ्या जीवनाचा दिन ढळला; आता मी कसे वर्णू?" असा भाव होता, तर प्रस्तुत कवितेत, "अजून मी काहीच पाहिलेले नाही; अजून बळ यावयाचे आहे, मी वर्णन तरी कशाचे करू?" असे म्हणणाऱ्या उदयोन्मुख तरुणाचे उलट भूमिकेवरून पाठविलेले उत्तर आहे. तांब्यांच्या कवितेत उतारवयाची विषण्ण गंभीरता आहे. तर इथें काव्यप्रांतात अजून नवख्या अशा हृदयाचा उडालेला गोंधळ आहे.

जिवलगा ! वर्णू रे तरि काय ?

सारंगीचा सूर घुमे आताशी
तोच कुठल्या रे आलाप-राशी ?
पायथ्यापाशीचा आहे प्रवासी
शिखरींची शोभा रे काय ? १

वर्णू कैशी मी प्रेममीलने ?
नाही अनुभविली गाढालिंगने
कुजबुजली नाहीत मनास मने
मादक माधुरी काय ? २

विरही जीवांची ती अत्यार्त गानें
भेदोनी गेलीच नाही मन्मने
ओलावली नाही पक्ष्मांची पाने
तरि मग वर्णावे काय ? — ३

का मज माहीत वात्सल्यमूर्ती
आईच्या अंतरी दाटे जी प्रीती ?
पोटी ना ऊमाळे खळबळुनी येती
सात्विक माधुर्य काय ? ४

सैकती सागर अत्यानंदाने
अखंड उलटीत लाटांची पानें
परि मज कळत न काय वाचणे
प्रतिभाही परतोनी जाय ५

नादावती अन्य-काव्य-गुंजने-
वेडावती मग हृदयाची गाने
परि नाही उमजत काय बोलणे
अस्पष्ट विरोनी जाय ६

पुणें ६ मार्च १९३९.

## – २ नादलुब्ध –

इतर कलावंतांच्या कलाकृति पाहून व ऐकून कलेच्या प्रांतात अनभिज्ञ असलेल्या पण तिथे पहिले पाऊल टाकण्याचा अनिवार मोह झालेल्या एका नादलुब्धाची बडबड.

कोणी येती, गाने गाती, वेडावती फार
मज वेडावती फार
लागेल का माझीयाही सारंगीची तार ? १

वारा हाले, झरा बोले, निसर्गाचे गान
चाले निसर्गाचे गान
माझीयाही अंतरात घुटमळे तान २

अंतराळी कृष्णमेघ पुटपुटे फार
आता पुटपुटे फार
वर्षाकाली ओसंडेल संगीताची धार ३

माझ्यापण खळबळ चाले अंतरात
आता चाले अंतरात
येईल का वर्षाकाल माझ्या जीवितात ? ४

मेघसंगीताने मत्त मोर नाचणार
मत्त मोर नाचणार
माझीया संगीते कोणी नाही गुंगणार ५

जरि नाही कोणी आले धरू नको याद
त्यांची धरू नको याद
दरी तुला प्रतिस्वने घालील रे साद ६

पीळ खुंट्या आतातरी वेळ नको फार
आता वेळ नको फार
जाऊदे तुटोनी तरी सारंगीची तार ७

पुणे. ७ एप्रिल १९३९.

## — ३ आली गीतांची बरसात —

आजवरी आळविले नाहीत मी सूर
सख्या नाहीत मी सूर
आइक आइक आता जाऊ नको दूर १

वायु हासे, लता रुसे वेळावीत मान
कशी वेळावीत मान
आनंदून पाहताना हरखलं भान २

गोठ्यातल्या कपिलीच्या डोळा लागे धूर
आता डोळा लागे धूर
सांग पाहू कसा राहू गानात मी चूर ? ३

गुरं वळताना गेले सवंगडी दूर
सारे सवंगडी दूर
एकला मी कोणा बोलू माझी हुरहूर ? ४

सांजा होता त्यांच्यासवे खरपूस भूक
येते खरपूस भूक
पानात वाढता गट्ट केले गुपचूप ५

ताऱ्यांसवे गावयाची खटपट खूप
केली खटपट खूप
आई परी थोपटून निजविते चूप ६

देवळात काकड्याची उजळते वात
मंद उजळते वात
सांभाळि सांभाळ आली गीतांची बरसात ७

पुणे २ डिसेंबर १९४२.

## – ४ शोधि मुशाफर गात –

शोधि मुशाफर गात कुणा हा ?
शोधि मुशाफर गात

प्रेमपूजना फुले जमविली
दृष्टि धुंडुनी सखिला थकली
द्यावी कोणा तशीच उरली
हातामाजीं राहुनि त्याच्या तिथेच सुकुनी जात १

शिणली काया कष्ट करोनी
अवमानाचा जाच गिळोनी
प्रेमळ अंकावरी विसावुनि
कुणा कथावी अश्रुसिंचनें हृदयाची मग तात २

थकला जरि तो शोधशोधुनी
दिव्य शांतवन देइ न कोणी
तया हिणविती उलट हसोनी
व्यवहारी जग भावमयावर असाच धरिते दात ३

आर्त भाव मग कुणा अळविती ?
तरल विलोचन कुणा धुंडिती ?
सापडली का सखी हवी ती ?
होय ! अता सापडे तया ती कवितेची सांगात ४

लाधे जरि नच मानवि कोणी
मिळे हीच भावमया रमणी
अंतःसंगीतातुनि निघुनी
तयासवे ती समरस नाचे हाती घालुनि हात ५

कढ हृदयीचे हिला वदावे
गूढ अंतरीचे उकलावे
तप्त मस्तका शांत करावे
कुजबुजताना कानि हिच्या तर उधळुनि द्यावी रात ६

हिच्यासवे नाचावे गावे
हिच्यासवे बेताल बनावे
बंध जगाचे फेकुनि द्यावे
क्षणभर होउन धुंद मनाने जावे अस्मानात ७

हास्य अश्रु तर इथे मिळाले
तार मुशाफर छेडित चाले
अर्धोन्मीलित झाले डोळे
अधरि चुंबुनी काव्य–कामिनी जाई गाणी गात ८

पुणे ७ ऑगस्ट १९३९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नोंद दि: ..................

## – ५ बंदिवान कवि –

प्रचलित राजसत्तेविरुद्ध आपल्या काव्याचे जहरी शस्त्र वापरल्यामुळे बंदीत पडलेला एक कवि.

जाऊद्या आणूद्या मला माझी एकतारी

अंबर कोंदून गेले
अंतरही कोंदाटले
अंबर गाईल परी मला गाया चोरी १

कोळी विणतसे जाळे
काढून अंगाचे धागे
मानस-गानाची माझ्या परी तुटे दोरी २

उभा येथ व्याकळून
दूर जीवितापासून
साद द्याया मानवा या यावे कोणीतरी ३

जरी नाही कोणीतरी
आणू द्या ना एकतारी
नादावून विसरेन माझी हुरहुरी ४

---

काय तरी हो मी केले ?
बंदीत येथे टाकिले
सत्यपालन का होते कधि दावेदारी ? ५

धुंदि आपुली पाहिली
मानवता उसळली
अन्यायाची भरविली चीड सर्वां उरी ६

अन्याय दूर न केले
मज बंदीत टाकले
काय तऱ्हा उफराटी आपुलिया दारी ७

सर्व चित्ते हेलावली
परि पाषाणी आपुली
सत्तामद लोपवितो माणुसकी सारी ८

तरी कशास याचना ?
पाझर का ये पाषाणा ?
अशीच पिचूदे हाडे बंदिशाला–द्वारी ९

दाटवून भाव मनी
गाईन जुनीच गाणी
छेडून कंपने मन्मनाची एकतारी १०

भुकेले उपाशी जीव
तदा जीवनाची शीव
ओलांडून जमतील येथ भवताली ११

आळवून मानवता
गाईन जीवित-गाथा
आसावल्या मने त्यात रंगतील सारी १२

कष्टले हे जीवनात
झाला आता जीवनान्त
छळणूक आठवून चिडतील तरी १३

देहाची झालीसे माती
त्यांना ना तुमच्या ताती
भुते हीच छळतील आपणाला सारी १४

व्यर्थ न होईल गाणे
माझे अंबराप्रमाणे
धागे गानाचे व्यर्थ ना कोळीयाचे परी १४

कशास हवा हा मज
बाह्य साधनाचा साज ?
खुशाल न्या आता दृश्य जड एकतारी १६

पुणे २३ सप्टेंबर १९३९

## — ६ निरोप —

कवित्वशक्ति अंगी असूनसुद्धा त्याला काव्यापेक्षा जीवनाची अधिक गाढ भुलावण होती. जीवनाशी समरस होताना त्यानं म्हणूनच काव्याची उपेक्षा केली. पण दुर्दैवानं त्याचा अंतकाल जवळ आणला. शेवटच्या क्षणी, ‘ जीवनात मोठेपण नाही तर नाही, एखादं अमर असं काव्य तरी करून जगाचा निरोप घ्यावा ’ असं त्यानं म्हटलं पण—

ऊठ कल्पने तू ! अता तरि गाउन जा काही
अशा ऐन वेळी सांग तू बोलत का नाही १

स्वप्नसृष्टिरंगी रंगुनी तुझ्यासवे गेलो
उधळुनि जीवितरास शब्दजालकी तुझ्या रमलो २

नको वाटली ती तुझी परि स्वप्नसृष्टि मजला
केवळ गुणगुणणे दाखवुनि शब्दांची लिला ३

तुझ्या भावलहरी गाठती कवनांची सीमा
जिवंत काव्यांना कवळण्या मला परी प्रेमा ४

वाटे फोल जिणे गाउनी केवळ मी मरणे
झगडुनि प्रत्यक्षात मरोनी कीर्तिरूप उरणे ५

नको स्वप्नसृष्टि नको ते तुझ्यासवे रमणे
परी गांजलेल्या देउनी हात इथे जगणे ६

जिवंत वाऱ्याने शिडे तर भरोनि टाकियली
डौलदार नौका ध्येयपथ आक्रमण्या चळली ७

काय अचानक हा हाय पण सागर खळबळला
उंच मृत्यु-लाटा पाहती मला चुंबण्याला ८

गलबलतो जीव बघ कसे थरथरती ओठ
कळे न टेकिल तो मृत्यु तर कदा थंड ओठ ९

जिवंत काव्ये ती अता परि कुठोनि गाण्याला ?
पाया भरलेला जीवनाचा तर ढासळला १०

धाव कल्पने तू ! अता तरि तुझ्यासवे गावे
अमर काव्य तरि एक शेवटी करोनिया जावे ११

अता निराशेने पाहि हा फुटो बंबे ऊर
जीवनार्थ जरि ना सांडुदे तुझ्यासवे नीर १२

दडुनि कुठे बससी अशा या शेवटच्या काली ?
दूर लोटली मी म्हणुनि का रागे तू रुसली? १३

धाव कल्पने ये गाउदे शेवटचे काही
कळे न गारठलीस किंवा भग्नशीत हृदयी १४

फडफडण्या थकले अता तरि तुझेहि का पंख ?
येई पाखरा ! ये कसातरि विसरव हे डंख १५

अरे ! खरे पण तू येउनी काय इथे करणार !
धावलीस जरि तू स्वर तुझे कुणा हृदयि घुसणार? १६

जीवित-गाभारा अता मम भंगुनिया गेला
नाद कुठे उरला प्रतिस्वन घुमवुनि देण्याला ? १७

असेच मी मरणे न करता पराक्रमा काही
काव्यहि गाण्याला शेवटी मला भाग्य नाही १८

फुके शब्दही गोड   गायना मला न सापडती
माळ निराशेचीच   अर्पिण्या उरे हि या हाती १९

विसर जगा मज तू जाउदे मिळोनिया माती
अखंड विस्मरणी   तवहि मज नीज येउदे ती २०

पुणें   १ नोव्हेंबर १९४२.

## ७ बीजेची ओवाळणी

आली भाऊबीज तेजाळून ज्योत
नयनीची प्रीत ओवाळिसी १

आली भाऊबीज देऊ काय तुज ?
प्रेमाविण मज देण्या नाही २

आली भाऊबीज ओवाळणीसाठी
अंतरीच्या गाठी मुक्त केल्या ३

सापडेना काही परि दोन मोती
नयनाखालती ओघळले ४

ताई ! हीच तुज भेट या भावाची
अमोल मोलाची अंगिकारी ५

पुणे भाऊबीज १९३९.

# –८ ही हसरी कलिका रडेल का ? –

दिखाऊ प्रेमानं तो पोळलेला होता. वरवरच्या हसण्यानं भुलून जाऊन त्यानं जिथं खरंखुरं प्रेम दाखवलं तिथं त्याला प्रेमभंगाचा अनुभव आला. मग त्यानं ठरवलं : 'हास्यात खरी सहानुभूति नसते, ती अश्रूत असते.'

ही हसरी कलिका रडेल का ?

कुंदकळ्या ओठातुन हासत
गालावर खळि तया खुलावट
नयनहि हास्यामधे तरंगत
परि हास्य हेच मज दुखवित का ?   १

मला पाहता मधुर हासली
वृत्ति परी मम उलट उदासलि
दुःख मनी झिरपुनी दुखावलि
ही विचित्र खळवळ अंतरि का ?   २

कळे न कोठे काय हि खुपते
न कळत मजला कसे दुखविते
उगीच हृदय आसवी भिजविते
ही अगम्य तळमळ निववील का ?    ३

विरोनि जावो जुन्या अठवणी
अता तयांची कशास खुपणी ?
परी जुन्याची नको उजळणी
हासुनी हृदय हे भुलवु नका    ४

मुळी न हे हृदयहि प्रणयातुर
धुंद होउनी चुरण्या अंबर
परि आलिंगिल हिला निरंतर
थरकेल नीर परि नयनिहि का ?    ५

उदासवाणा मला बघोनी
सहानुभावे हृदय भरोनी
अंतरिच्या भावना उकलुनी
भंगला अश्रुसर दाविल का ?    ६

जरि माझ्यास्तव हीहि रडेल
सहानुभावे हृदय निवेल
आसु टिपाया ओठ हलेल
अन् हसेल अंतर ममहि फुका ७

पुणे ३ नोव्हेंबर १९३९.

## — ९ स्वप्नमाधुरी —

Time ! You old gipsy man ! Will you not stay ?' असे कोणीही कितीहि काकुळतीने विचारले, तरी काल कुणाकरताही थांबत नाही. तरी पण—

थांब थांब अदया काला थांब जरा येथे

बरी यक्षभू सापडली मुदे न्हावयाला
स्वप्नमाधुरीची सगळी पाझरते माया
नयन अर्ध मिटता वाटे भीति मन्मना या
उरेल का माधुरि ही परि जीवनात येथे ? १

धुके अवतिभवती पसरे मंजु भावनेचे
त्यावरीच तरळति कैसे सूर कल्पनेचे
वारुणीच ही जणु पिउनी तरल भाव नाचे
नको ओसरू दे ही रे धुंद वामपंथे २

दडलि भावि जीवनि कैशी काय काय भाग्ये?
भावि काळ घेउनि येतो काय काय संगे ?
नको कल्पनाही मुळि ती स्नेह शंकितो ते[1]
याच कल्पनेच्या जाळी थांबुया जरा ते 3

पुणे–पाचवड प्रवास २४ फेब्रुवारी १९४०

[1] कारण 'अतिस्नेहः पापशङ्की ]

## – १० महाबळेश्वर –

१९४० सालच्या मे महिन्यात महाबळेश्वरला गेलो असताना व निसर्गाने मनमुराद उधळलेल्या आपल्या सौंदर्याचा मोठ्या प्रसन्न मनाने आस्वाद घेत असतांना एक प्रसंग घडला. एका सार्वजनिक बागेत एक भिकारी एका सुशिक्षित व खानदानीतल्या तरुण जोडप्याजवळ भीक मागत होता. त्यातल्या तरुणाने आपल्या हातातल्या कॅमेऱ्याने त्या भिकाऱ्याचा आपल्याला हव्या तशा पोजमधला फोटो काढून घेतला. पैसे मिळतील या आशेने भिकाऱ्यानेही तो काढून दिला. तो तरुण त्या फोटोवर मासिकातल्या चढाओढीत कदाचित् दहा पंधरा रुपयांचे बक्षीसही मिळवू शकला असेल. पण त्याने त्या भिकाऱ्याला काहीही न देता तसेच हाकून लावले.

सुरम्य निसर्गसौंदर्याच्या सान्निध्यात असले मानवी क्रौर्य पुष्कळदां पहायला सापडते नाही !

डोळा नीज येता शाल ओढीयेली
निद्रेत निमाली चांदरात १

झालीसे प्रभात उधळते सोने
गवाक्षावाटेनें आंत येई २

बाहेर पडता वाऱ्याचा अंचळ
कानी खळबळ कुजबुजे ३

भरोनीया ऊर निसर्ग-निर्मळे
पानी घननीळे ओतीयेले ४

तरारले शेत डोंगर-पायाशी
निसर्गाची कुशी समृद्ध ती ५

पिवळे शेंदरी पानी खेळे ऊन
लता ती लाजून थरकते ६

शांत नि गंभीर दिसे सरोवर
नभाचे अंतर प्रतिबिंबे ७

सूर्याचा प्रकाश डोंगरावरून
खोल दरीतून काय धुंडी ? ८

लाल लाल रस्ते उधळते धूळ
धुंद डोळ्यातील युगुलांच्या ९

वाटे वैभवाने धुंद आली डोळा
धुक्याचा पसारा गुरफटे १०

वैभव केवळ नाही निसर्गाशी
कांचनाच्या राशी उधळल्या ११

डौलाचे प्रासाद निसर्गाच्या संगे
धुंद अंतरंगे श्रीमंतांची १२

विखुरली क्षेत्रे खेळतसे खेळ
मोदें एकमेळ वैभव ते १३

पाहू देत तरी वैभवाची राणी
उल्हासाची खाणी रूप काय ? १४

परी हाय आता मन का पांगुळे
पायीच घोटाळे खुपणीने ? १५

वाटेत भिकारी वस्त्र नाही अंगा
वाटे पंचगंगा[1] डोळ्यातली १६

महाबळेश्वर २४ मे १९४०

[1] पंचगंगा—श्रीक्षेत्र-महाबळेश्वरातील कृष्णेचा उगम.

## – ११ करि अज्ञाताचे दार खुले –

करि अज्ञाताचे दार खुले
का ठेविसि नुसतेचि किलकिले ?

रुणझुण अजुनी घुमते कानी
नाचत बसली कोण येउनी ?
हा कृष्णसर्प वक्रता विसरुनी
परि अजुनि कसा तन्मयचि डुले ?. १

उमऱ्याच्या आतुर ओठावर
कुणी उठविले कोमल पदतल ?
हा ओला अळिता ममहि निरंतर
ओढुनि नेतो मनिचीच मुळे २

पाझरते हिम चोहिकडोनी
थंड कुंद परि मधुर भासुनी
का स्वस्थ बसावे नेत्र मिटोनी
अज्ञाताचे जरि राहिल सगळे ?

पुणे – १९४०.

## – १२ अबोलीची फुले –

जरा विषण्ण मनाने    पायी तुडवीत राने    १

एकलाच चाले वाट    परी मनी मूक गीत    २

ओढा चाले खळाळत    मोदे ऐके आसमंत    ३

परि जवळले फूल    हळू बोले काय बोल ?    ४

मोठ्या कर्तृत्व-नादाने    डोले कितीकांची आशा    ५

परि कळेल का कोणा    सामान्याची मूक भाषा ?    ६

राउळीचा घंटानाद    भक्त वेडावील सारे    ७

पुष्पी पडल्या दवाचे    कळतील का उमाळे ?    ८

उगा कौतुक वाटले    फूल खुडोनी घेतले    ९

कौतुकाने निरखिता    मन थोडे विसावले    १०

हाती धरोनीया जाता 'नाव काय' ? विचारले
कोणीसेसे हळू बोले ही ती अबोलीची फुले
इवल्याशा रंगी कळ्या मशि कितीक बोलल्या
किती मंजूळ ही तरी अबोलीची मूक बोली

दूर राहिलो आपण नाही बोल बोलायला
मम मूकभाव तरी सांगतील का या कळ्या ?
जरी प्रेमाने घेतल्या बोलतील काहीतरी
किंवा टाकले चुरून वास भरेल अंतरी

पुणे भाऊबीज १९४०

## – १३ वचन मीच तव मोडियले ग !–

जिच्या सहवासाने आपल्या साऱ्या कर्तृत्वशक्ती जाग्या झाल्या त्या व्यक्तीला आपला दिलेली वचने मोडली गेली तर अशी चुटपूट लागून राहते.

वचन मीच तव मोडियले ग !
रुसुनि कुठे लपलीस सये ग !

निद्रित मी रजनीच्या संगे
कवनाचे विसरोनी धागे
तूच करुनिया मजला जागे
हाति धरुनि मज चालविले ग    १

तरि न तुझे परि भाव निमाले
वल्लरि कुरबुर कानी बोले
हनु उचलुनि मी तुज सांगितले
स्वर्ण-कांति तव काव्यि कथिन ग    २

तरि बोलि न नयनांची संपे;
निर्झर खळबळ गाई कंपे;
विसरुनि जाई मनिची पापे
फलकि रंग तव सजिव करिन ग ३

तरिहि तुझे थरथरले ओठ
अजुनि कशामधि तरळे प्रीत ?
सांगितले तुज भिडवुनि नेत्र
मूक गान तव स्वरि अळविन ग ४

काय तरी अवखळ ती रीत
तरिहि तुझे भिरभिरले नेत्र
सांगितले तुज कवळुनि हस्त
शिल्पि भाव तव परि भिजविन ग ५

ऐकुनिया मम अविरत बोली
तृप्ति तुला कसलीशी आली
श्रांत वदन मम टेकुनि गाली
सौख्य–स्वप्नि रंगुनि निजलिस ग ६

हाय परी विसरुनि तव आस
विसरुनिया कांक्षेचा ध्यास
मोडुनिया मम वचने मीच
मोह-पाशि गुंतुनि निजलो ग ७

कथिले नच वैभव कवनांनी
रेखियले चित्र न रंगांनी
गाइयली नच माधुरि गानी
शिल्पि भाव नच कोरियले ग ८

उगिच तुला लावियला छंद
उगिच तुला आणियली धुंद
फसवुनिया तुज निजलो मंद
म्हणुनि खास दुखवुनि लपलिस ग ९

येइ सये सोडुनिया राग
तुजविण राहु कसा मज सांग
पाश जड जरी तुटणे भाग
तेहि करुनि तुजजवळ पळिन ग १०

पुणे डिसेंबर १९४३.

## – १४ तरणा दर्यासारंग –

सांगू कशी तिला ? बोलू कशी तिला ?
दर्याचि खळबळ, मनाचि मळमळ,
बोलू कशी तिला ?

भोळी वेडी पोरं, विनवी सांगा सारं
म्हंजि माझं मनोगत, धुंडिल सारं गलबत,
जाल जवा समिंदरा १

टेकड्या हिरव्यागारं, फिरलो दऱ्याखोरं
अश्शा लाटा गारीगार, डुलती हलती हिरव्याचार,
डुलवी जवा वारा २

शेताच्या बांधावरं, धोतरा फुलला फारं
अस्सा हसतो समिंदर, लाटेच्या व्हट्टावर
फुंकुन खाऱ्या धारा ३

माझ्या उरावर, दमुनी ठेवी शिर —
पण ते हले श्वासावर, गलबत अस्सं डुलतं फार
लाट डुलवी त्याला ४

कवळी जुईवानी, काय करू माझी रानी
कापत जागंल सारी रात, सागर हलवील झंझावात
खरं जरि सांगंन् तिला ५

पुणे १८ डिसेंबर १९४०

## –१५ जाउ नको देउ रे वसंत दारातला–

'मी पुन्हा येऊ नये' असं म्हणतोस; ठीक आहे ! जातो मी ! पण नियमितपणानं येणाऱ्या वसंत ऋतूला मात्र विसरू नकोस.

जाउ नको देउ रे वसंत दारातला

सया तू नि मी मिळुनी
आजवरी कष्ट करुनि
फुलल्या पुष्पांनी बघ
भरिलि पर्णशाला १

स्नेहाचे गाढ भले
कलश भरुनि आणियले
हसत तेच जल ओतुन
भरित आलवाला २

इथे जाति–पुष्प हसे
बकुळीला भरत पिसे
चंपक गंधेहि करित
तृप्त अंतरला ३

हाय ! परी रमुनी जो
तव संगे खपलो तो
मीच कसा खुपत तुझ्या
कळेना मनाला ४

असो ! कशा वाद करू ?
मोद-गंध का विसरू ?
निमुटपणे जात मीच
ऐक निरोपाला ५

लाभे नच मम हसलो
ना स्वार्थें मुळि रमलो
असे खचित मजहुनि मज
मोद अधिक प्यारा ६

परि डुलता फूल तुला
मम मुखशशि जरि दिसला
चुरडु नको कुसुम तेहि
करिच या कृपेला ७

घालुनि हातात हात
मोदाची धरुनि साथ
आजवरी गुंफिलि ती
भंगु नको माला ८

उत्साहे गाइ गान
फुलवि पुन्हा बाग सान
दुरुनीही स्मृतिचित्रे
सुखवितिल मनाला ९

पुणे ६ मार्च १९४१.

## – १६ जीवना ! भंगु नको रे स्वप्न –

जीवना ! भंगु नको रे स्वप्न

आजवरि पदतली तुडविले
सुरम्य, दुर्गम तुझे परि कडे
फलप्राप्तीने क्लेश निमाले
पाहतसे सुखस्वप्न १

शबल शाल पांघरुनी निजले
आसमंत चमकते साजिरे
दुरुनि तरि गिरी दिसति गोजिरे
मोडु नको हे स्वप्न २

येथे क्षणभर मज विसावु दे
शिदोरि सोडुनि भूक शमवु दे
मृगजल प्राशुनि नीज घेउ दे
पाहु दे तरी स्वप्न ३

कल्पनेचि मग छेडुनि वीणा
निरर्थक तरी मारिन ताना
आळवुनी अतृप्त भावना
तोवरि टिकुदे स्वप्न ४

आसमंत जरि सारे खडतर
इथुनि परी दिसते रे सुंदर
स्मृतिफलकावर रेखिन सत्वर
मोड तदा मग स्वप्न ५.

चढण तव जरी न चुकायाची
हसतमुखानेच चढायाची
मार्गि परी या पाथेयाची
जोड मला दे नित्य ६

पुणे २० सप्टेंबर १९४१.

## – १७ ताई –

माझ्या तू बीजेला नोकझोक केला
मंदिल बांधिला जरतारी १

कंठि घालुनिया मोतियांची माळ
कुंकुमाने भाळ रेखियले २

काय तरी थट्टा आता का मी बाळ ?
लावियेलं काळं गालबोट ३

इतुके करोनी ओवाळसी ताई !
ओवाळणी काई घालू तुला ? ४

रत्ने, मोती, धन तुझेचि सर्व हे
माझे काही नोहे तुज द्याया ५

देऊ कोठली मी जडाचीच पागा
भावनेच्या जगा योग्य की जी ? ६

विचार करता अश्रु ओघळत
तदा ओले होत गालबोट ७

आता तुझ्या गाली लावितो मी तेच
खुलेल त्यानेच ताईराणी ८

पुणे भाऊबीज १९४१.

## – १८ भावनेचे विश्व –

सलिलनिधिरिव प्रतिक्षणं मे भवति स एव नवो नवोऽयमक्ष्णोः। कालिदास

जरि जुने तेचि तरि जुने न ये
विश्व नित्य अपुले नवे सये

बाण पाखरा, वाल्मिकि दुखला
कळवळुनी शाप-वाणि वदला
ओघ तोच हा पुढे चालला
परि तया जीर्णता कदा न ये १

कितीक सुमने सुकली गेली
रक्तता नुरे वृद्ध-कपोली
पदतला जरी उरलि न लाली
परि सौंदर्या त्या मरण न ये २

कितिक पाडसे चुकलीमुकली
मातृस्तनापासुन ओढियली
दूध तेहि सुकले जरि गाली
परि वत्सल-भावा मरण न ये ३

दुःख नुरे भरतभेट झाली
विरही रामा जानकि मिळली
पुत्र-मुखे कौसल्या निवली
परि करुण-रसाला मरण न ये ४

साम्राज्ये बघ धुळीस मिळली
ताठर धुंदी नमुनि वाकली
दर्पयुक्त नामे त्रिरघळली
परि वीर रसाला मरण न ये ५

अन्यायाने मनि भरलेली
चीड जरी वितळोनी गेली
विषाद-वृत्ती जरि जुनि झाली
तरि विषाद-भावा मरण न ये ६

पुरी तपस्या मुनिची चुकली
शंकर भुलवी भिल्लिण-बाळी
कितिकांची अशी शांती ढळली
परि शांत रसा त्या मरण न ये ७

असो आपुली जुनीच प्रीत
आळवुनी हसणारे नेत्र
भाव-आर्तता नवीच त्यात
सर नवतेची त्या कशा न ये ८

पुणें २४ एप्रिल १९४२.

## – १९ दीनानाथा ! तुज नाथ कोण भगवंता ? –

परमेश्वरा ! तू आमच्याहून फारच मोठा आहेस हे सांगायला का पाहिजे ? पण एका गोष्टीत मात्र मी तुझ्याहूनही मोठा आहे. मला माझं वडील मनुष्य आहे; तू आहेस. पण तुला कोण आहे ?

दीनानाथा ! तुज नाथ कोण भगवंता ?

प्रभात झाली सरली रजनी
सूर्य उगवला हासत अवनी
कुतूहलहि नयना उघडोनी
पाहत आता १

प्रीतीचा कुणि सांडुनि प्याला
रंग गुलाबी गालि पसरला ?
कोण प्रतिदिनी नटवि धरेला ?
मिळण्या कांता २

वाकवुनी कुणि इंद्र-धनुकले
जल-वर्षांचे बाण मारिले ?
कुतूहले या तुज-भवताले
जमतो प्रीता ३

तरि हलति न तव दगडी ओठ
परि जन कथिती पुराण-पाठ
तूच खरा आदि-अंत-रहित
हलविसि चित्ता ४

असो ! कशाला वाकुड-भाव ?
अम्हा मिळाला अमुचा देव
तुला भजावे विसरूनि जीव
आता ताता ५

तुजभवती परि गोळा होता
एक विचारच हलविल चित्ता
कोण तुझा रे उदास असता
कवळिल माथा ? ६

काहीतरी जरि अघटित घडले
अनंति विरलो आम्हि तव मुळे
सांग तुला तरि कोणाचें उरले
रमण्या ताता ? ७

विश्व-वृक्ष जइ गद्गद् हलतिल
नक्षत्र-फुले टपटप गळतिल
वेचुन लगबग तीच वाहशिल
कुठल्या माथा ? ८

जरि परमेशा ! दीन बापुडा
भार जिवाचा जरि नच थोडा
कुरवाळाया मज तू असता
तुजहुनि मोठा ९

पुणे २८ एप्रिल १९४२.

## – २० आशेस –

अशीच आशे गा तव सुस्वर
टाक घुमवुनी मानस-मंदिर

फिरवि हस्त शिणलेल्या भाली
देइ मनाला नवी उभारी
उत्साहित करि गात्रे सारी
ध्येयसाधना झटिन निरंतर १

मन गुंफित शंकांचे जाळे
श्रमसाफल्याचि शंकु लागले
दिव्य वेणु तव वाजवि बाले
बुडवि त्यात तो कटु कोलाहल २

आजवरी मज धीर दिला तू
धरूनि हाति मज चालविले तू
तुजसंगे फिरंता नच किंतु
नैराश्याचा शिवत खरोखर ३

असाच धाविन ग तुजसंगे
ध्येयातींचे सुख अनुषंगे
अपयश आले जरि मज मार्गे
सुखद कष्ट-स्मृति तरि परि उरतिल ४

जरि ठरले ध्येय-स्वप्न मृगजळ
स्वप्न-माधुरीतिल तव सुस्वर
ऐकुनि अंतरि भरलेले पर
समाधान ते नव्हेचि मृगजळ ५

पुणे २० जुलै १९४२.

रा. क्र. १७८६४
शाखा

## — २१ आर्ता —

जगातल्या सत्प्रवृत्त माणसांमध्यें दोन तऱ्हा असतात. आपल्याला एकदा जे ध्येय पटले त्याच्यावर अढळ निष्ठा ठेवून त्याच्या प्राप्तीसाठी पिसाटासारखी झटणारी एक; अन् बुद्धीच्या सर्वंकषत्वामुळे त्या चोखंदळ बुद्धीला कोणतेही ध्येयच पूर्णत्वाने पटणे कठीण आणि त्यातूनही पटले तरी ती निष्ठा फार काळ अढळ राहणे दुरापास्त अशा मनःप्रकृतीची दुसरी. पहिल्या तऱ्हेची माणसे कमी बुद्धिवान् असतील. पण त्यांची ध्येयविषयक भावना जाज्वल्य असल्याने ती सर्वस्वी त्याला वाहिलेली असतात. जड सुखदुःखांचा मोह त्यांना पडत नाही. उलट दुसऱ्या प्रकारच्या माणसांपुढे कसलेच ध्येय नसल्याने ती जड सुखदुःखांच्या पसाऱ्यात सहजच गुरफटली जातात. कवितेतील 'आर्ता' पहिल्या प्रकारची प्रतिनिधिभूत आहे; तर तिला उद्देशून बोलणारा दुसऱ्या प्रकारचा आहे.

उभी तिरावर धुंडि पैलतिर
नजर बावरी ओढ कोठली?
कुणा धुंडि ती निरखुनि स्थिरचर?

काय हरवले ?    नाच सापडे
पिसे तयाचे    जरी लागले
काय हुडकिसी    इतुकी बाले ?
ओढ आर्त तव हलवी अंतर   १

गेली सोडुनि    का तुज नाथ ?
का तव पाडस    ओढि कृतांत ?
कोणामागे    इतुकी आर्त
होउन पाहसि सांग खरोखर   २

ऋषी जसा    निज ध्यानि निमग्न
विज्ञानी वा    प्रयोग-मग्न
जड सुखदु:खे    जाति विसरून
त्यापरि धुंडिसि काय गाढतर ?   ३

अरे ! कोण मी    विचारणार ?
तुज पुसण्याचा    नच अधिकार
सुखदु:खे जी    जगी तरलतर
तयामाजि मी पडे पिचत तर   ४

नसे मजसि कसलीही ओढ
ध्येय दिसत ना भजण्या गाढ
नव्हे मूढ तू आम्हिच मूढ
जगाच्याच व्यवहारि बुडत जर ५

पिसे लागु दे कशाचे तरी
ध्येयपथी वा आलि जरि दरी
वलांडण्याची बेदरकारी
देइ ध्येय अन् जरी मूढतर ६

पुणे २४ जुलै १९४२.

## — २२ आशा-ज्योत —

ही मंद ज्योत मम राहिल का ?

किती हिला मी जपुनि आणिली
आशेच्या अंजुलित झाकिली
कुणाकुणाला विझवु नच दिली
ती तेवत आता राहिल का ? १

हिला पाहता धरा हासली
"क्षुद्र ! क्षुद्र !" अशि हिणवु लागली
"तूच क्षुद्र न हि" म्हणुनि झाकिली
ती अता तरी परि राहिल का ? २

निर्मळ फसवे ते जल-भूत
हिला भारुनी बुडवू पाहत
वरि धरुनी तिज आलो पोहत
ती मंद ज्योत मम राहिल का ? ३

तेजाचा हा अफाट झोत
विश्वा जाई जाळित पोळित
मंगल ज्योतिस उलटा हिणवित
परि दृष्ट न पडुनी राहिल का ? ४

अनिलहि आता झुळुझुळु वाहुन
मोहुन टाकू पाही मम मन
नच फसता तिज आलो घेउन
ती अता ज्योत मम राहिल का ? ५

गगनहि भरले शून्याकार
मज पुढतीही शून्य विशाल
परि शून्यि अनंतचि आशाजाल
शोधुनि आलो ती राहिल का ? ६

पंचमहाभूतांशी लढलो
पापशंकि मन्मना झगडलो
अखेरीस परि घेउन आलो
तर अता तिला फुलविशील का ? ७

## — २३ वाट चालू —

विशाल जीवनाच्या उदात्त हाकेपुढे आपण घरादाराला विसरतो किंवा दूरवरच्या क्षितिजाकडे झेपावताना पायाशी पडलेल्या सौंदर्यांना अगदी नकळत पायदळी तुडवतो. पण पुष्कळदा The better should not be the enemy of good हेही खरेच नाही का ?

जा तरि जा परि वळुनि पहा

बोलावित तुज अथांग अंबर
भुलविति विशाल-जीवनिचे स्वर
असाच पुढती जाइ तरी पर
थबकुनि क्षणभर खालि पहा १

रम्य पसरले क्षितिज दूरवर
जादु रुपेरी सांडति विधु-कर
असाच मोहुनि जाइ त्यास पर
दलित फुलांचा गंध पहा २

आता झुंजुनि थकले मम मन
पणतीतिल संपले तेल पण
परि घालुनिया नवे तैल-कण
तिज तरुण पुन्हा तू करशिल का ? ८

घालशील नच नवे तेल तर
मोठी होउन विझुदे ती पर
नको नको ग घालू फुंकर
आस ही तरी पुरविशील का ? ९

पुणे १२ ऑक्टोबर १९४२.

## – २३ वाट चालं –

विशाल जीवनाच्या उदात्त हाकेपुढे आपण घरा-दाराला विसरतो किंवा दूरवरच्या क्षितिजाकडे झेपाव-ताना पायाशी पडलेल्या सौंदर्यांना अगदी नकळत पायदळी तुडवतो. पण पुष्कळदा The better should not be the enemy of good हेही खरेच नाही का ?

जा तरि जा परि वळुनि पहा

बोलावित तुज अथांग अंबर
भुलविति विशाल-जीवनिचे स्वर
असाच पुढती जाइ तरी पर
थबकुनि क्षणभर खालि पहा १

रम्य पसरले क्षितिज दूरवर
जादु रुपेरी सांडति विधु-कर
असाच मोहुनि जाइ त्यास पर
दलित फुलांचा गंध पहा २

पसर पसरशिल भाव-पंख तर
कल्पनेत तरि विश्व-गोल धर
त्यात गुंगुनी विसरु नको पर
पद्तलिचा मधु-कणहि महा ३

अंतरिक्ष जरि विशाल सुंदर
तिथे पोचतिल पार्थिव नच कर
जरा पाहि रे थांबुनि तव घर
तव शब्दा आतुराचि अहा ४

पुणे

२८ ऑक्टोबर १९४२.

## – २४ समजूत –

पहातापहाता शैशव सरले
ओघानेच आले यौवन ते १

वयासवे आता बुद्धि अन् भावना
मन अन् कल्पना वाढताती २

शैशवीची प्रीत रुसली-फुगली
क्षणात हासली निर्व्याज ती ३

यौवनींची आता व्याजानेच बोले
नयनी तरळे प्रीति-ज्योत ४

ताई ! जरि आता दूरदूर गेलो
जवळि वा आलो आपणहि ५

शैशवाच्या परि रुसलो फुगलो
भावे वा बोलला यौवनाच्या ६

अंतरात जाण बाह्य हे आकार
आत ज्योत स्थिर कायमची ७

पुणे भाऊबीज १९४२.

## – २५ अशीच माझी रीत –

वेडे ! तुझ्या दुःखानंच हे सुंदर सूर निघतात. पण या एकांतात जरी तू आलीस तरी ती सारंगी वाजणार नाही; दुःख गजानं गिरवून दाखवणार नाही.

कशीहि म्हण तू तिला सये परी
अशीच माझी रीत

नाचत थरकत येई वारा
हलवित पर्णा हळुच सळाळा
विहगहि चिवचिव बोलति बोला
कोलाहलि या नको वाटते गीताची परि प्रीत १

जेथ मिसळती अनेक सूर
तो स्वर-मेळहि मधुर असेल
तिथे परी मी राहिन दूर
शब्दांचे वा स्वरांचेहि ते नको नको संगीत २

यापरि मग तो दिवस सरेल
आसमंत शांतिने भरेल
गवाक्ष-पटलहि पवन न हलविल
सारंगीच्या सवे म्हणिन मम एकलकोंडे गीत ३

गेलीस मना चटका लावुन
हृद्वीणेच्या तारा छेडुन
भाव-स्वरांनी अंतर भारुन
तूच मला शिकविलेस यापरि तव विरहाचे गीत ४

अता जरि इथे तूही येशिल
आगमनाची जाणिव देशिल
परोपरीने कितिहि विनविशिल
सारंगी नच गिरवुनि दाविल तुला शोक संगीत ५

पुणे

११ नोव्हेंबर १९४२.

## – २५ अशीच माझी रीत –

वेडे ! तुझ्या दुःखानंच हे सुंदर सूर निघतात. पण या एकांतात जरी तू आलीस तरी ती सारंगी वाजणार नाही; दुःख गजानं गिरवून दाखवणार नाही.

कशीहि म्हण तू तिला सये परी
                अशीच माझी रीत

        नाचत थरकत येई वारा
        हलवित पर्णा हळुच सख्याला
        विहगहि चिवचिव बोलति बोला
कोलाहलि या नको वाटते गीताची परि प्रीत      १

        जेथ मिसळती अनेक सूर
        तो स्वर-मेळहि मधुर असेल
        तिथे परी मी राहिन दूर
शब्दांचे वा स्वरांचेहि तै नको नको संगीत      २

यापरि मग तो दिवस सरेल
आसमंत शांतिने भरेल
गवाक्ष-पटलहि पवन न हलविल
सारंगीच्या सवे म्हणिन मम एकलकोंडे गीत ३

गेलीस मना चटका लावुन
हृद्वीणेच्या तारा छेडुन
भाव-स्वरांनी अंतर भारुन
तूच मला शिकविलेस यापरि तव विरहाचे गीत ४

अता जरि इथे तूही येशिल
आगमनाची जाणिव देशिल
परोपरीने कितिहि विनविशिल
सारंगी नच गिरवुनि दाविल तुला शोकसंगीत ५

पुणे ११ नोव्हेंबर १९४२.

## – २६ बंध –

नित्य फिरायाला जात तो मार्गाने दिसली
निसर्ग-आश्चर्ये तयाने मन्मति धगधगली १

वाटचाल करता रान ते मोदानेच डुले
दृष्टि न ठरु देता प्रस्रवण बेदरकार पळे २

जरा थांबुनी मी विमल ते उदक हाति धरिले
मम अंजुलि-बंधी स्थिरावुनि बिंबहि डोकवले ३

जळत स्थंडिली तो यज्ञिचा वैश्वानर धाड
नीरांजन अणिले लावुनी मी गोमय-खांड ४

येथ संथ तेवे मंद अन् मंगल ती ज्योत
प्रकाशुनी आता तीच परि मम मुख उजळवित ५

मला वाटते की घालुनी कुडिचे मम बांध
अशीच मम केली धगधगी जीव-ज्योत मंद ६

पुणें १७ नोव्हेंबर १९४२.

## – २७ बालिकेस –

सार्वजनिक नळावर पाणी भरणाऱ्या एका श्रांत पण अजाण बालिकेस पाहून—

घट भरुनि चालला थांब थांब
दे दमल्या देहा क्षण विराम

अजुनि सानुली तुझी तनुलता
करपुनि गेली कष्ट उपसता
कोमल गाली दुःख मिसळता
सौंदर्य दिसत नच, दिसत घाम १

कुणि विसकटले सुरम्य रंग
इंद्रधनूचा करुनी भंग ?
कुणी दुखविले सुहास्य सांग ?
मूक दृश्य वदते करुण काम २

हिज सुखबिंदुहि द्या ईशा चट
कष्ट-सिंधुचि कशास खटपट
भरुनि सांडणे नकोच भव-घट
क्षण हसुदे होउनि पूर्ण-काम ३

पुणें २० नोव्हेंबर १९४२.

## — २८ संधिकाल —

निशानाथ अस्ता जाई    दिन आळेपिळे देई
तारे पहा फिकुटले    ईश मिचकवि डोळे
मज टाकी संभ्रमात    म्हणू दिन का ही रात ?
मज काहीच ना कळे    ईश मिचकवि डोळे
चांदणेही क्षीण झाले    रवितेज नच आले
मन होत वेडेखुळे    ईश मिचकवि डोळे
दव शाल पांघरून    हात लावी मागाहून
हळू काहीसेसे बोले    ईश मिचकवि डोळे
येथ आता यौवनात    बाल्य वार्धक्य मिळत
गोड गांभीर्य उजळे    ईश मिचकवि डोळे

पुणे    २४ नोव्हेंबर १९४२.

## – २९ मानवपण –

असाच हिणवुन मज अपुरा म्हण
त्यातच उजळे मम मानवपण

अपूर्णतेचे चेतवि इन्धन
धडाडुनी जळुदे रे जीवन
जळताना उडतील तेज:कण
त्यातच उजळे मम मानवपण १

अपूर्णतेचा खवळवि सागर
वायुसवे भांडुदे निरंतर
हसतिल त्यामधि क्षीण फेनकण
त्यातच उजळे मम मानवपण २

सदा पूर्ण ते नको देवपण
सदा शून्य वा दगडी जीवन
नको नको रे मज कायमपण
त्यात न उजळत मम मानवपण ३

क्षण हसविल मज अथांग आशा
क्षण रडविल वा निविड निराशा
सतत चालु दे परि ऐरणघण
त्यातच उजळे मम मानवपण ४

पुणे २९ नोव्हेंबर १९४२.

## – ३० सृष्टीपुढचे प्रश्नचिन्ह –

काय काय घडले ते या कवितेत सांगितले आहे. ते कां व कसे घडले हे कुणालाच सांगता येणार नाहीं. कारण ते सृष्टीपुढचे प्रश्नचिन्ह आहे.

एकले कुठेसे होते
आनंदे जणु लवलवते । उपवन
दवबिंदु तेथ थरथरती
अन् रसिक मनामधि भरती । शिरशिरी
आसमंत अळवित सूर
निर्झर त्या देई ताल । खळखळा
अरुणोदय आता झाला
विहगही बोलती बोला । चिवचिव
ती बघा, फाकली प्रभा, उजळवी नभा ।
येइ रविराज, सोनेरी घालुनि साज । उपवनी
पूजनास आता बसली
लाजरी प्राचि मुसमुसली । यौवने
भक्त ज्ञानि कुठले कुठले

पूजनास गोळा झाले। प्रभुपदी
" रागद्वेष तव पदि नसती
परमेशा ! " म्हणुनी स्तविती। आदरे
यापरी, युगयुगांवरी, अखंडित धरी।
चासरे मोद, सृष्टिही घालते साद। त्या स्थळा
एकदा त्या स्थळा आला
कुणि असाच तो अलबेला। मानव
त्याजला पाहुनी हसली
"तू कशा येथ ? " अशि वदली। सृष्टि ती
"येथ पूर्ण सारी दुनिया
झगडा नच येथें कसला। " बोलली
परि अता, त्यास पाहता, लागली व्यथा।
ईर्शी हृदयाला, क्षणि धावत धावत गेला। मागुती
एकटा मनाशीं वदला
" आत्मार्पण ठाउक मजला। मुळि नसे
निर्विकार बसुनी बघणे
हे वाटत लाजिरवाणे। आजला
आत्मार्पण करता हसती
ते मजहुन मोठे गमती। मानव "

बोलुनी, धावला क्षणी, हात पसरुनी।
धराया त्याला, धावता दूरवर गेला। कुणिकडे ?
यापरी ईश तो जाता
लागले सृष्टिच्या चित्ता। वेड ते
मोदाचा झाला भंग
दुःखाचे भिसळति रंग। त्यामधे
"देव नाहि" म्हणती कोणी
"अस्तित्व पहा हे" म्हणुनी। भांडती
"हे असे, जाहले कसे ?", असे जो पुसे।
त्यास ते म्हणते, प्रश्नचिन्ह सृष्टीपुढते। सोत्त्व

पुणे ५ डिसेंबर १९४२.

## — ३१ चिमणी —

उजाडल्यावर पिलास चारा आणण्यासाठीं त्याला सोडून चाललेली चिमणी.

सोड सानुल्या ! सोड जाउदे
सोड अतातरि सोड

घरट्यात तुझी किलबिल किलबिल
ऐकुनि चिमण्या ! सारे भुलतिल
आइच का मग सोडुन जाइल ?
लगेच जाउन येते घेउन घास भरविण्या गोड १

हिरवाळीतुन, गिरिकुहरातुन
वेडिंवाकडी वळणे घेउन
झरा कसा बघ येई धावुन
खळाळतो ते ऐकुन गमते तुझीच त्याला ओढ २

शेत बघ कसे डुलते झुलते
धुके पांघरून स्वस्थ पेंगते
मुग्ध-मधुर की स्वप्न पाहते
जागवि त्याला देउनि रे तव चिवचिवण्याची जोड ३

अता परी बघ धूमवलयते
निळ्या अभाळी विरुनी जाते
कवणा घरि ही चूल पेटते ?
सोड ! मला लागते अता तव चाऱ्याची अति ओढ ४

ममतेचे मम घास खाउनी
वाढ पुरासा असाच अजुनी
उडुन जाइ मग पंख पसरुनी
वाढल्यावरी खुशाल हे मम बंध चिमुकले तोड ५

दूर असा तू जाता जाता
ठाव नभाचा काढु पाहता
सुखी करो तुज नित्य विधाता
येशिल का क्षण उडुनी परता पुरविण्यास मम कोड? ६

पुणें ७ डिसेंबर १९४२.

## – ३२ चतुर –

तांबड्या रंगाचा व पारदर्शक पंखांचा एक उडता कीटक.

चतुर खरा तू वाटसि चतुरा ! मला तरी बा रे !
पाणथळीवर काय हुडकिसी ? सांग मला सारे !
देह चिमुकला, पंख चिमुकले, चिमुकलेच सर्व
माफक सौंदर्याचा अपुल्या तुला कुठुनि गर्व ?
तुला न लाभे मोरपिसारा डौल मिरविण्याला
मंजुळ कुठले ? तुला तर नसे तोंडहि गाण्याला
रसिक-सूर्य तरि तव पंखावर हात हलुच फिरवी
पारदर्शि त्या अभ्रकातुनी रंग गोड गिरवी
मुले खेळकर धावत धावत तुज धरण्या आली
पकडुनि त्यांनी तुज दोऱ्याची शेपुट बांधियली
मौज वाटली म्हणुनी देतो तुज जाता जाता
माफक सौंदर्याची मम ही चिमुकलीच कविता

पुणे ९ डिसेंबर १९४२.

## – ३३ निद्रागीत –

रात्रीच्या वेळी दूरवरून कानावर पडलेले सतारीचे बोल ऐकून—

आता लावित सृष्टि सतार

प्रभाति कोमल, दुपारि भास्वर
ऊन चटचटे फार
तेहि जाउनी सायंकाली
शांत स्तिमित होणार १

उषा गुलाबी, दिन सोनेरी
सुचित्र सायंकाल
तमात परि ते सारे मिसळुन
तारे चमचमणार २

छाया भुलवी, प्रकाश बोलवि
धावुनि दमले फार
पाठशिवणिचा खेळ खेळता
आसमंत निजणार ३

सारा दिनभर, दैवाशी तर
मीहि झुंज देणार
बुद्धिबळांचा पट मग फेकुन
भावगीत गाणार ४

पुणें १९ डिसेंबर १९४२.

## — ३४ अतिस्नेही मनास —

सोडुनि दे तव भूल राजसा !
सोडुनि दे तव भूल

खुल्या दिलाचे अथांग निर्मल
इथे पसरले मोहक रे जल
खळाळता परि पायी कोमल
तुला दिसे प्रतिकूल १

रजनि रंगवी सुनील अंबर
कसे पसरले शांत नि गंभिर,
परि होता पानांची सळसळ
तुला गमे प्रतिकूल २

शेत कसे लवलवते सुंदर
कणसे ही हाकारित तुज तर
काटा रुपता परि मार्गावर
भासतसे प्रतिकूल ३

आवर ना स्नेहाची माया
तीच भिववि अन रडवि मना या
गोड ओढ तव दाहक राया
लावि जिवा हुरहूर ४

पुणें २१ डिसेंबर १९४३.

## — ३५ अहेतुक —

झोपेत हसणारे तान्हे मूल पाहून—

प्राजक्ताचा सडा पडे त्यात हसे फूल एक
तसे बाळाचा हासणे मज वाटे अहेतुक १

हरभरा सोलताना हसती जे ओले घाटे
तसे बाळाचे हासणे मज अहेतुक वाटे २

प्रभातीची सारी सृष्टी हसे घालुनिया साज
तसे बाळाचे हासणे अहेतुक वाटे मज ३

स्वप्नी आपुल्या बाळाचे गोड पाहुनी कौतुक
सहेतुक माय हासे बाळ हसे अहेतुक ४

दृश्य गोड ते पाहून शुद्ध प्रीतिचे प्रतीक
जागृतीत आणि आता मीहि हासे सहेतुक ५

पुणे २४ डिसेंबर १९४२

## – ३६ विड्या –

येता माघ गुलाबि गोड पडली थंडी तिने कापत
शेकोटीजवळी वयस्क बसुनी होते विड्या फुंकत
देता बार भरोनि आणिक अता तोंडात तंबाखुचा
शौकी त्यामधि येउनी मिसळतो तो पावणा गावचा
तेथे आणुनि बांधली कुणितरी धेनू तिच्यामागुनी
आला बालक धावता दिसतसे ते दृश्य त्या तेथुनी
लावोनी टक तो तिथें 'क्षण मजा पाहू' म्हणोनी बसे
वाटे त्यास अता तरी 'करु मजा ऐशीच काही' असे
ओढावी विडि जेवि ऐटित तशी बोटे मुखी ठेवुनी
आणी सोडित वाफ थंडित तशा जोरात तोंडातुनी
जाता चोळुनी हात तो हुडडण्या बाहेर अन् तेथुनी
वाटे मूर्तिमती मजा पळतसे ही स्वैर हातातुनी

मीही येथ निसर्ग वेढुनि धुके आता जधी पाहतो
वाटे हा क्षण टेकुनी वळचणीपाठी विड्या फुंकतो

पुणे २ जानेवारी १९४३.

## – ३७ आठवण –

आज कशी न कळे आठवण जागृत होवोनी
चाळवीत बसते स्मरणिचे चंचलचपल मणी १

अजुनि नव्हति तेंव्हा उजळली मम जीवन-ज्योती
मार्ग क्रमू लागे मनी मी तुज धरुनी हाती २

वातावरणि तदा गमत मज भरला मधु-गंध
अणूअणूमधुनी सळसळे अस्फुट आनंद ३

वनराई तिथली थबकुनी जणु वेड्यावाणी
लागुन कानाला झऱ्याच्या झुळझुळली गाणी ४

थबकुनी मीहि तसा मनातच तुजला आठवुनी
भविष्यकालाची खोदिली मुग्धमधुर लेणी ५

धीर धरूनि अन् मी पुढतिचा पथ जो आक्रमिला
तयानेच माझा उजळला मार्ग पहा पुढला ६

गेलिस सोडुनिया  जरी तू मज लागोलाग
नाहि तुझ्या हाती  रोखणे मम जीवन-मार्ग  ७

पहा चालले मी  धरुनि ही आशेची कविता
पुढे काहि होवो  झगडणे हेच ब्रीद आता  ८

बावरलो क्षण मी  मला तू सोडुनिया जाता
काहुर गोड उठे  आज परि सारे आठवता ९

आणि मला वाटे  झगडता तव प्राप्तीसाठी
हाती जी उरली  तुझ्याहुन स्वप्ने ती मोठी १०

पुणे  ४ जानेवारी १९४३.

## – ३८ विश्वरूपदर्शन –

‘ मला कल्पनेत होणारे ’ हे शब्द येथे अध्याहृत आहेत.

विश्वाला म्हणति आदिअंत नाही
मधे मीही राही लोंबतच १

आलो कोठून मी ? जाणार मी कोठे ?
हुरहूर वाटे न कळता २

वाटे आकाश ते धरेला मिळाले
धावावे तो पळे पुढेच ते ३

वाटे कल्पनेचे पंख पसरावे
त्यातही न मावे परि विश्व ४

सारे निराधार कसे मी म्हणावे ?
कसे अन् पटावे बुद्धिला ते ? ५

सारे निराधार कसे समजावे ?
कसे ते पटावे भावनेला ? ६

कल्पनेला वाटे विश्व एक खोली
आणि बंद केली तिची दारे ७

“ आहे काय कोणी आत बैसलेले ? ”
दार ठोठाविले वारंवार ८

ठोठाविता कोणा शब्द ऐकू आले
आणि ते म्हणाले “ देव आहे ” ९

ठोठाविता ज्यांनी ऐकले न काही
बोलतात तेही “ देव नाही ” १०

पाहिले प्रत्यक्ष काहीच ना कोणी
दाविती बोलोनी अनुमाने ११

अनुमानांचा या सारा खेळ चाले
त्यावरि चालले वाद सारे १२

कशाला मी सारा खटाटोप करू ?
आणि हुरहुरू मनातच ? १३

बुद्धि आणि तर्क धावता थकला
आणि त्या म्हणाला 'अज्ञेय' तो १४

अज्ञेयाला कशि गवसणी घालू ?
खोली कशी खोलू बुद्धिने मी ? १५

म्हणुनि मी त्याला साकार हो केला
दृष्टित आणिला भावबळे १६

जसा ज्याचा भाव तसा त्याला देव
'भाव तसा देव' तुका म्हणे १७

हसता मी तसा देवही हसेल
निराश बसेल निराशता १८

If at all erring, I am erring on the safer side.

झटता मी तोही
होता मी होईल

उद्योगी झटेल
दैववादी १९

सदाचारी मीही
सवेच बनेल

होता तो होईल
दुराचारी २०

म्हणुनि म्हणतो
वाटते सुंदर

" सत्य नि मंगल
विश्व मला " २१

पुणें ९ जानेवारी १९४३.

# – ३९ आई ग ! –

लहानपणी आईजवळ असणाऱ्या बाळ्या खेडेगावातल्या पंतोजींच्या शाळेत शिकत असतो. पुढच्या शिक्षणासाठी त्याला शहरात जावे लागते. कॉलेजच्या सुटीत तो आपल्या गावी येतो. त्यावेळी त्याच्या मनापुढे प्रस्तुत कवितेत रंगविलेली कल्पनाचित्रे उभी राहतात आणि त्यातूनच शेवटच्या कडव्यातील विचार उद्भवतात.

आई गेलो ग मी दमुनी
म्हण ना म्हण अंगाई–गाणी

का ग अशी तू गाली हससी ?
"लहान का तू ?" म्हणुनी म्हणसी
दूधभात का मज न भरविसी ?
ये ना ग मजजवळी फिरूनी १

फिरूनि सांग रामाच्या गोष्टी
राम भटकला हरणापाठी
कांचन-मृग ते येता चित्ती
त्यासव जाइन जागृति त्यजुनी २

" श्री ग शिकव " असे मी म्हणता
पुरेवाट तुझि होई हसता
" खुळा " म्हणुनि तू मजसी म्हणता
वाटे तो[1] तरि यावा फिरुनी ३

पाठित मजला दिलेस रट्टे
तूच घालतेस ना धपाटे ?
पंतोजींना लावुनि पाठे
घेतलेस ना पाढे घोकुनि ? ४

लेक तुझा बघ आता शिकला
मोठा होउनि जवळी आला
सांग परंतु आता त्याला
निजसि न का तू कुशीत घेउनि ? ५

[1] म्हणजे माझ्यातला खुळेपणा.

खरेच का मी मोठा झालो ?
बाळपणाला माझ्या मुकलो
अनंत विश्वे पाहत थकलो
घरकुल माझे गेलो विसरुनि ६

पुणे १२ जानेवारी १९४३.

# – ४० भाऊराया –

प्रतिवर्षि भाऊराया  फक्त ओवाळुन तुज
मीच तुझिया प्रेमाची  घेतली रे भाऊबीज  १

बघ संक्रातिचा सण  आज पोचला येऊन
आणि मला वाटले की  तुला द्यावी प्रेमखूण  २

पूर्वी मनी हे योजून  हलवा मी खूप केला
तोच आता तुजसाठी  वाटीत हा आणियेला  ३

लगबगीने मी किती  दुकानात एका गेले
आणि भाऊरायासाठी  छान कापड घेतले  ४

तरी पुरी वाटेनाच  भेट इवलीशी मला
आणि तुला द्यावयाला  गुच्छ फुलांचा घेतला  ५

अजुनिही आहे तुला  आवळ्यांचा भारी सोस
म्हणुनि मी आणियले  त्यांचे तोडुनिया घोस  ६

तरि नव्हतेच झाले माझे पुरे समाधान
वाटे प्रेम सारे माझे कशी येऊ मी घेऊन? ७

वाटे घेऊन मी आले वस्तु आणखीही साऱ्या
तरी तुझिया प्रेमाला पडाव्या त्या कैशा पुऱ्या? ८

विचारात आता याच बघ तुझ्या घरी आले
तुझ्यापुढे सारे काही भीतभीत ठेवियले ९

भेटी माझ्या तदा साऱ्या उगा कौतुके पाहोनी
आणि आवळे चाखता पाहिलेस तू हासोनी १०

हास्यातच गोड तुझ्या आली बरं माझ्या हाती
आता तुझिया प्रेमाची गोडगोडशी पावती ११

पुणे १४ जानेवारी १९४३

## — ४० भाऊराया —

प्रतिवर्षि भाऊराया फक्त ओवाळुन तुज
मीच तुझिया प्रेमाची घेतली रे भाऊबीज १

बघ संक्रांतीचा सण आज पोचला येऊन
आणि मला वाटले की तुला द्यावी प्रेमखूण २

पूर्वी मनी हे योजून हलवा मी खूप केला
तोच आता तुजसाठी वाटीत हा आणियेला ३

लगबगीने मी किती दुकानात एका गेले.
आणि भाऊरायासाठी छान कापड घेतले ४

तरी पुरी वाटेनाच भेट इवलीशी मला
आणि तुला द्यावयाला गुच्छ फुलांचा घेतला ५

अजुनिही आहे तुला आवळ्यांचा भारी सोस
म्हणुनि मी आणियले त्यांचे तोडुनिया घोस ६

तरि नव्हतेच झाले    माझे पुरे समाधान
वाटे प्रेम सारे माझे    कशी येऊ मी घेऊन ? ७

वाटे घेऊन मी आले    वस्तु आणखीही साऱ्या
तरी तुझिया प्रेमाला    पडाव्या त्या कैशा पुऱ्या?८

विचारात आता याच    बघ तुझ्या घरी आले
तुझ्यापुढे सारे काही    भीतभीत ठेवियले    ९

भेटी माझ्या तदा साऱ्या उगा कौतुके पाहोनी
आणि आवळे चाखता    पाहिलेस तू हासोनी १०

हास्यातच गोड तुझ्या    आली वरं माझ्या हाती
आता तुझिया प्रेमाची    गोडगोडशी पावती    ११

पुणे    १४ जानेवारी १९४३

## – ४१ माझ्या मना –

नको मला इतरांशी कधी तोलू माझ्या मना
मज कसेसेच वाटे मनी येता ती तुलना १

इतरांच्याहून जरी श्रेष्ठ तेंव्हा मी ठरेन
वाटे गुंगुनी गर्वात चढतानां मी पडेन २

आणि इतरांच्यापेक्षा हीन जरी मी ठरेन
फुका मग निराशेने हिरमुसला बसेन ३

नको नको ना रे असे तुलनेचे खेळ खेळू
झोका घेताना जोराने मज लागे कळमळू ४

चल उतरना खाली आता हिंदोळ्यावरून
इतरांना ठरवू दे मोल तुझे पारखून ५

पुणे १५ जानेवारी १९४३.

## — ४२ आवाहन —

क्षणभर तरि मज विसरुनि भान
करुदे ना सखि तव आवाहन

पुष्पांजलि ही बघ तुजकरिता
समर्पणाला घेउन येता
नको उद्याची शंका आता
लवकर जाइल सुकुनी म्हणुन १

रेखाकृति तव रम्य काढिता.
कातर कर थरथरतो आता
नको नको ती[१] शंका चित्ता
अश्रुजलाने जाइल पुसुन २

[१] म्हणजे मेघदूतातील यक्षाच्या अनुभवाने आलेली शंका.

सूरसागरी बुडुनी जाता
वाटे मजही गावे आता
नकोच शंका स्वर पुटपुटता
फुका दिगन्ती जाइल विरुन ३

करुदे क्षणभर बन्द कवाडे
उदवत्तीचा गंध पसरुदे
दीप तेवता शंका हरुदे
म्हणुदे क्षणभर तव आवाहन ४

पुणे २० जानेवारी १९४३.

## – ४३ कावळ्याचे शहाणपण –

होता एक तृषार्त फारच असा, कोणीतरी कावळा
आणी तो सुरईतले जवळच्या पाणी पिऊ लागला
होते तोंड निरुंद त्या सुरईचे अन् पाणि थोडे तसे
काकाला मग ते तिच्यातिल अता पाणी मिळावे कसे
डोके खाजविता तयास सुचली युक्ती पहा छानशी
टाकावे सुरईत आणुनि खडे वाळूतले ते अशी
त्याने ती सुरई जधी भरियली सारी खड्यांनी मग
त्याची हारपली तृषा म्हणुनिया तुम्ही धरावी तग

होतो वाचित मी पुन्हा सहज या तात्पर्य गोष्टीतले
तेथे आज मला परी दिसतसे काहीतरी, वेगळे
वाटे काक नव्हेच हा तर पहा तृष्णार्त की मानव
टाकोनी सुरईत तो दिनखडे चाखू पहातो चव
त्याला ते सुरईतले जल तसे लाधेल केव्हां बरे ?
आणी गोष्टितले शहाणपणही होईल केव्हा खरे ?

पुणे २४ जानेवारी १९४३.

## — ४४ डोके उठविणारे तत्त्वज्ञान —

तत्त्वज्ञान माझे उठविते डोके
फुका मन मुके आनंदाला १

माणसांचे जग म्हणे छायारूप
प्रकाश तो खूप दूर आहे २

माझ्याच्याने त्याचा लागेनाच ठाव
फुका माझा जीव हुरहुरे ३

कशाला उगाच मज त्रासविता ?
उठवू पाहता जगातून ४

जगातच रमे मावनाचे मन
त्याला तुम्ही कोण हसणारे ? ५

त्याच्या तीरावर जरासा बसेन
आनंदे गाईन भाव-गाणी ६

असेल असू दे छायारूप जग
त्यातूनच मार्ग प्रकाशाला ७

पुणे २६ जानेवारी १९४३.

## — ४५ स्वरांनो ! करू नका गलबला —

करू नका गलबला
स्वरांनो ! करू नका गलबला

कितिं करता कोलाहल !
डोक्यात उडे गोंधळ
मग गाउ कसा मी तर ?
जरा तरि स्वस्थ बसू द्या मला १

नादात मला भुलवुनी
एकतारि पळविलि कुणी ?
द्या परत मला आणुनी
ना तरी स्वस्थ बशिन आपुला २

बाजार भरविले जसे
पायपोस पायी नसे
मग मी तरि गावे कसे ?
न्याय हा उफराटा चांगला ! ३

मम उन्मादाचे क्षण
ठेविले अलग काढुन
ते अत्तर मग ओतुन
तयाने काव्यकुप्या भरियल्या ४

जरि माजवाल गोंधळ
तरि मिळेल नच अत्तर
वाटेल आणि हळहळ
कुप्या मग फुटतिल जधि चांगल्या ५

पुणें २८ जानेवारी १९४३.

## – ४६ का असा दूर जासी –

देव कोणालाही भेटलेला नाही हे माहीत असून सुद्धा सर्व मानवी प्रयत्न थकले असे वाटू लागले की आपण देवाकडेच धाव घेऊन त्याला म्हणतो की–

का असा तू दूर जासी ?

धुंडितोसी काय न कळे
भाव कसला नयनि तरळे ?
थांब ना रे क्षण मजमुळे
किति युगांचा मी उपाशी १

पूजनाला मी सकाळी
कितिक सुमने तबकि अणिली
ठेचकलुनी दारि पदतली
सांडल्या ना पुष्पराशी २

बावरा वेडा खुळा मी
ध्यान तव रे करु कसे मी ?
कैशि यावी सांग कामी
प्रार्थना मम दूरदेशी ३

पाउले तव मज न कळती
ना ठसे वा मुळि उमगती
हृदयि माझ्या करुनि वसती
अजुनि का तू मज न कळसी ? ४

अपुरी माझी प्रीत सखया
संकुचित रे मोहमाया
म्हणुनि देता ती त्यजुनिया
सत्यहि न ये हस्तपाशी ५

याच देही याच डोळा
रूप तव जो पाहु वदला
मोक्ष देउनि त्या तुक्याला
मज असा का येथ त्यजिशी ? ६

संग न घडे सज्जनांचा
म्हणुनि माझी दीन वाचा
परि पडेना उमग त्यांचा
म्हणुनि का जवळी न येसी ? ७

पोटि घालुनि सर्व सखया
धरि मला उरि रे सहृदया
आसरा दे ना जिवा या
का उदारा दूर जासी ? ८

पाचवड १८ फेब्रुवारी १९४३.

## — ४७ रात पळुनी चालली —

रात पळुनि चालली पहा पळुनि चालली
तारकांच्या टाचण्यांनी जरि आकाशा टाचिली १

किंवा वाऱ्याने बांधून गुंडी चंद्राची लाविली
तरी भावगीतापरी रात पहा निसटली २

पुणे २३ फेब्रुवारी १९४३.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८५४

## –४८ बंधमोचित पोपटास –

जा दूर अंतराळी उत्फुलशा मनी
तुज पाखरा कसा रे मी ठेवु कोंडुनी ?

बाजार आठवे का जै दाम देउनी
तुज पञ्जरात या मी ठेवीत घालुनी

वाटे तदा मला की हे गेह सानुले
समृद्ध सर्व-सौख्ये मी येत घेउनी।

अन् प्रत्यही तुला मी रे येथ न्हाणिले
आलो तुझ्यासाठी डाळिंब घेउनी

दाणे तुला स्वहस्ते मी काढुनी दिले
पेरू नि डाळ आलो वाटीत ठेवुनी

तुज 'रामकृष्ण बोला' हा मंत्र मी दिल
सुखवीसि नित्य मज़ला ते बोल बोलुनी

सारे खरे परंतू माझ्याचसाठि मी
तुज येथ ठेवियेले एकाकि कोंडुनी

तव आप्त, मित्र, दयिता रे राहिले दुरी
स्मरुनी तयास झुरसी रे काय तू मनी ?

क्षण नयन अर्ध मिटुनी तू काय चिंतिसी ?
अन् काय अंतराळी बघतोसि धुंडुनी ?

रमण्यास चित्त माझे तुज येथ आणिले
नेई तुझे परी मी स्वातंत्र्य हारुनी

रिझवीसि बोलुनीया मज नित्य राजसा
तुज मात्र कोंडणारा निष्ठूर मी धनी

जा स्वैर अंतराळी स्मृतिपाश ठेवुनी
त्यांनीच मी स्वतःला घेईन बांधुनी

कड्डूस — १० एप्रिल १९४३

## -४९ जुन्या बाजारातील ज्योतिषी-

होता मांडुनि ठाण एक बसला कोणीतरी ज्योतिषी
वाची काहितरी मधून पुढचे लावोनिया चाळिशी
होता गोंधळ भोवती जरि किती बाजारि त्या चालला
खाली घालुनि मान मग्न पुढचे वाचीत हा बैसला
कंटाळून मधेच तै क्षणभरी तो थांबवी वाचन
पाही ज्योतिष पाहण्यास भवते आले कुणी का जन?
नाही येत कुणी अजून म्हणुनि भारी दिसे खिन्न तो
आणी खास मनोविनोद म्हणुनी चंची पुढे सोडतो
होती चंचितली परंतु सगळी पाने तदा वाळली
त्याने ती निरुपाय होउनि अता टाकोनिया तै दिली
आता तो चिमटी मुखात नुसत्या तंबाखुची सोडतो
आणी हात कपाळि लावुनि तदा उद्विग्नसा बैसतो

होते हस्तठसे कितीक भवती पाहोनिया वाटले
देवज्ञासहि भाग्यचक्र आपुले केंव्हाहि ते ना कळे

डूस                                                                                १० एप्रिल १९४३.

# — ५० व्याध —

पारधी जमातीतल्या जीवनक्रमाच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेली एक भावकथा.

तीरकामठा राकट अपुला सरसावुनि व्याध
करवंदीच्या जाळीमधुनी लावितसे वेध
तोंडावरती वेली येती सारुनि त्या बघता
रम्य दिसतसे दूर पसरला विंध्याद्री भवता
गिरिमाथ्यावर रविबिंब अता डोकावू लागे
कोमल कर पसरोनी करिते आसमंत जागे
अजुनि ठिबकती अधुनीमधुनी दवबिंदू पानी
गमते ओथंबली सुधेने की सुमधुर धरणी
सुधा तेथली मिळवाया परि कष्ट फार पडती
उग्ररूप विंध्याद्रि पाहुनी भरत मनी भीती
निबिड पसरले रान तेथले करित किर्र बोला
गुहांमधुनि तर घुसण्यालाही प्रकाश घाबरला
तुटके दिसती कडे कितितरी तळचे परि रान
मार्ग रोखुनी दुरुनी ऐकवी निज जंगल-गान
कडे पाहुनी हरपत अपुले भीतीने भान

खुशाल परि तो लोटि धबधबा धो धो धो प्राण
कुठुनि पोचणे अशा या स्थली हात मानवाचे
खचिताचि म्हणुनी राज्य चालले येथ- निसर्गाचे
तांबुस डोळे टवकारुनिया येथ ससा येतो
पान हालता भिउनि मागुता दुड दुड दुड जातो
अवचित निघुनी कपारिमधुनी ओहळ झुळझुळला
रानफुलांचा वेल त्यावरी पहा कसा लवला
वनहरणांचा कळप येतसे जलपानाकरिता
वाघहि म्हणुनी अवचित येणे निजभक्ष्याकरिता
जगण्यासाठी जीव जिवाला असाच खायाचा
कुणाकुणाला काच न चुकला जीवनकलहाचा
तरिहि वनाचे भुरळ पाडती मनास ते रंग
उग्रपणातहि दडुनि बैसते रम्य अंतरंग

उग्र अशा त्या विंध्याद्रीमधि व्याध उग्ररूप
विपिन तेथले धरुनि अवतरे जणु मानवरूप
पोलादाचे जणू बनविले अंग गर्द काळे
विंध्याद्रीवर भिरभिर फिरती क्षण भेदक डोळे
कितीक वर्षे व्याधाला जरि जन्मुनिया झाली

नसानसातिल बेदरकारी नव्हती मालवली
तांबुस डोळे टवकारुनिया पीळ मिशिस देई
सुंभ जळे परि पीळ वृत्तिचा पूर्विचाच राही
अता तिथे परि अटळ वृद्धपण दिसे होत जागे
तुरळक मधुनी केस मिशीचा पिकावया लागे
दिसते कमरेभवति तयाने धडुते कसलेले
विंध्याद्रीवर वणवण फिरता जीर्णशीर्ण झाले
तसे तयाच्या जीर्ण मनाचे वस्त्र फाटु लागे
स्मृतिरूपाने येती हाती विरविरीत धागे

दूर कुठेशी होति पसरली पुष्कळशी पाले
तेच नाहि का रानि तयाचे घर पहिले झाले ?
अवचित येता सरसर शिरवे खेड्यामधि जावे
उघडिप मिळता बाहिर अपुले खोपट मांडावे
झटपट मोडुन बिऱ्हाड अपुले पाठिवरी न्यावे
पोटामागे एकसारखे वणवण भटकावे
जाळि टोपल्या घेउनि हाती बापाने जावे
बाजलि धरुनी मग आईने मागे चालावे
भांडी मडकी धरुनि बरोबर त्याने रखडावे

सवईने मग त्याच जीवना मजेत निरखावे
काळगतीने चटक लागली त्याच जीवनाची
आइबापही मरुनी जाता दृढतर हो साची
गळयात घालुनि शीळ लाकडी रमतगमत जावे
आवाजाची नक्कल करुनी कबुतर चकवावे
कितीक गावामधुनि तयाने लपत छपत जावे
गुरे पळविता ध्यान देउनी शिपाइ चुकवावे
जाळ्या लावुनि चित्ते, हरणे कितितरि पकडावी
कमाइ अपुली विकुनि ज्वानिची धुंद पुरी प्यावी
वाण भासता धाड घालुनी कणसे चोरावी
साहस करुनी भाकर अपुली खुशाल मग खावी
वाऱ्यावरती भिरभिर फिरणे हाच एक छंद
कुठुनि असावा ठाउक त्याला घरचा घरबंध ?
अशीच त्याची हयात सारी भरभरभर सरली
सरतासरता चुकुनि एक परि प्रीत तया उरली
पलिकडच्या टेकाडावरती खोप एक दिसते
तिथेच घेउनि बाण-धनुकली खेळत ती बसते
शिरप्या नच का त्या प्रीतीचे लाडिकसे नाव ?
तिथेच आता त्याचा उरला सर्व जीवभाव

शिरप्याच्या परि नावाभवती स्मृति थबकुनि रमते
गतगोष्टींचे चित्र फिरुनिया हळुहळु उलगडते

झालं त्याचं लगीन असता ज्वानीचा बहर
होती तेंव्हा त्याचि अस्तुरी लहानशी पोर
बोरजाइचा बामण होता लगीन लावाया
मौज वाटली नवरि कडेवर घेउन मिरवाया
सई पोर परि थोर गुणाची मन राखी चतुर
व्याधासंगे विजलीवाणी चमचमते नार
किंवा वाटे शरासनाची व्याधाच्या दोरी
वाकवि त्याला परि अनुसरुनी त्याचे मन चोरी
हाय परी ती खरीच ठरली नभातली बिजली
दूर जगातुन व्याधाचे मन भेदुनिया गेली
व्याधा वाटे पहिलि भवानी उफराटी झाली
तेंव्हापासुन आयुष्याची तवाच पालटली
होती त्याच्या अंगि तदा परि मस्ती मुसमुसली
दैवगतीची म्हणुनि अवकृपा नव्हती जाणवली
सई मरुनिया जाता त्याचं घरही विस्कटलं
आणिक आता पारधीमधी मन जास्तच रमलं

तांबूड फुटता व्याध शिकारिस जाया निघत असे
सूर्य डुबेतो सावज धुंडित भिरभिर भटकतसे
दशवर्षांचा काल तयाचा असा जरी गेला
एकलकोंड्या तोच जिवाला विरंगुळा झाला
काळगतीनं झरझर त्याचा लौकिक पसरविला
लोक बोलती असा साहसी शिकारि ना झाला
दैवगतीने जणु चापातुन सुटलासे बाण
दर्पाने निज कापित चाले कीर्तीचे रान
चतुर्दशीला कृष्ण जातिचं देवकार्य आलं
तेंव्हा जमुनी सर्वांनी मग त्याला प्रार्थियलं
गोत बोलला " तूच जातिचं नाव राखियेलं
म्हणुन खास रं तूच आमुचा नाइक हो झालं"
गोताच्या म्हणण्याचा त्यानं पुरा मान केला
अन् मानाचा मंदिल त्याच्या शिरावरी चढला
तसा तयाला तीरकामठा सवे नजर केला
तोच तयाचा मग कायमचा सांगती झाला
काम संपता चिमण्यावाणी गोत उडुनि गेला
दाभाड्यांचा खंड्या लागुन कानी कुजबुजला
" भल्या नाइका ! एकुटपनची अता सोड तंद्री

करुनि घे तू बाइल म्हणुनी माझी भन चंद्री
वाटंल् तितका पैका देतो तुज लग्नापायी
सगळ्या जातीमधी आमुचं अस्सल कुळ अरई ”
तांबुस नयनी त्याच्या क्षणभर हालचाल झाली
आणि गळाला जणू मासळी लागुनिया आली
गोड बोलण्या भुलुनि तयानं पटकन् “ हो ” म्हटलं
खंड्यानंही देवासाक्षी कुंकू लावियलं
शिरवंती अन् रुखवत कितितरि थाटानं झालं
लगिन सोहळ्यामधि तर अख्खं गोतहि दुमदुमलं
जेवण देता सगळ्या गोता ओशट किति खपलं
दारूपायी किति वर्सांचं द्रव्य रितं झालं
माळ घालण्या जेंव्हा लाजत चंद्रि पुढं आली
तदा तिच्याशी त्याची पहिली दृष्टिभेट झाली
व्याधा वाटे ‘ श्रीमंताची कवळी ही पोर
संसाराचा भार हिच्याने कैसा निभणार ?
आडरानिही मी तर ऐसा वणवण फिरणार
माझ्यामागे साद देत ही कैशी येणार ?
दुरुनि पाहण्या रम्य कीर्तीची चमचम निमिष जरी
टिकेल परि का माझ्याजवळी राहुनि जन्मभरी ?’

शंका त्याची क्रमाक्रमानं हळुहळु खरि ठरली
जीवाची ती फरफट अपुल्या तिला न मानवली
बारिकसारिक तिच्या कुरबुरी अता सुरू झाल्या
संसाराच्या सुखवस्त्राला चिरण्या की पडल्या
तयासवे ती कष्ट उपसण्या सारखि कंटाळे
आणिक माहेरी जाण्याचे सुरू करी चाळे
सांजा होता शिकार घेउन व्याधाने यावे
पोटाला मग करून घालण्या चंद्रिस सांगावे
चूल फुंकता झिंज्या सारुन चंद्री कुरबुरते
" कमाइ विकता दुपारभर मी किति दमुनी येते ! "
संसाराचे संगित यापरि होई बदसूर
एके ठायी असुन मनाने घुटमळती दूर
हाका करता रानि तयाचे दुमदुमती नाद
संसाराच्या रानि परी त्या मिळे न पडसाद
ऋतु बदले तरि सदा चंद्रिची सुकलेली वेल
या वेलीवर कुठून मग ते उमलावे फूल ?
व्याधा वाटे ' खचित आजचे जीवन संपेल
दुःखातुन या उद्या सुखाची येइल चाहूल'
पायाखालिल सरासर सरके वाळू कालाची

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ५६३ पाउलवाटे ७८। ६५०

आणि लटपटे त्या वाळूवर आशा व्याधाची
सांजा होता शिकार करुनी व्याधाने यावे
पोरावाचुन घर ते नुसते भकास भासावे
चंद्रि असलि तर चार घास तरि पोटी ढकलावे
ना तरि लावुनि दृष्टि अभाळी जीवन कंठावे
पन्नाशीची झुळुक तयाला लागाया आली
संसाराची भूक तरीही तिळभर ना शमली
मासळिवाणी जीव तळमळे प्रीतीवाचून
वाटे 'संसारिच्या जळामधि सोडिल का कोण ?'
सई मरुनिया जाता त्याचं जरि घर विस्कटलं
आयुष्याची चढण धावता बोचक ना झालं
आयुष्याचा अता परी तो उतार सुरु झाला
पाठीमागं कोणि न दिसता पराण गलबलला
ज्वानीमध्ये जरि धावतसे किति हरणापाठी
म्हाताऱ्याला सदा हवीशी हातामधि काठी
हळव्या त्याच्या अता जिवाला धीर न मुळि निघला
चंद्री टाकुन तदा रकिमशी म्होतुर लावियला
खंड्या जरि ते कळता आतुन पुष्कळ जळफळला
अंतर्यामी सूड ठेवुनी वरपांगी हसला

आणि म्हणाला "नाइक आपण मैतर जल्माचं
एकामेकापासुन मुळि ना फाटुन जायाचं
पहिल्यापासुन अशीच चंद्री भारी चवचाल
आता माझी पटली खातरी पुरी बालंबाल
मरुदे तिजला चला ताडिचं घेउ दोन घोट
तमाशातल्या बघु जैतेच्या नाचाचा थाट"
कौसालाला व्याध तयाच्या पुरापुरा फसला
आणिक जाळ्यामधी येउनी अवचित सापडला
व्याधामागं मग खंड्यानं प्रवाद पसरविला
" तमाशातल्या जैतेचा हा हात धरुनि गेला "
दुग्धधवलशा जीवनि त्याच्या विषबिंदू शिरला
व्याधकीर्तिचा त्याने सगळा प्रवाह नासविला
गोतामध्ये व्याधाची परि जरब पसरलेली
जाब म्हणुनिया विचारण्याची छाति न कुणि केली
वर्षाच्या परि आत रक्मिही काळानं नेली
तिच्या पाठिवर बाइल केली तीही परि मेली
काळ जणू की झरझर लिहितो व्याधाचा ग्रंथ
मधेच सुटली कोरी पाने त्याचि न त्या खंत
म्हाताऱ्याच्या अता जिवाचा सुटलासे ठाव

अंतर्यामी दाटुन आले सर्व आर्त भाव
म्हणे मनाशी ‘ एके दिवशी मी तर मरणार
माझ्यामागं अठवण काढुन कोणि न रडणार ’
पुढच्या लग्ना खंडोबाला म्हणुनि नवस केला
“ बकरं कापिन तुला खंडुबा प्वार देइ मजला
खंडोबानं नवसा पावुन अर्ज ऐकियेला
दो वर्षांच्या आत भिमीला शिरप्या हा झाला

जीवनि त्याच्या जणू चांदणे पसरे मोदाचे
तयाखालती आणि मनाचा रत्नाकर नाचे
जीर्ण जिवाच्या पंखामधुनी भरलासे जोर
कोनाकोनामधुनि भिरभिरे आशा चौफेर
अविचित यावा जसा फुलोरा वठल्या वृक्षाला
जीवनवृक्षहि तेवि ज्वानिनं दरदरुनी गेला
आजवरीचं मूक तयाचं खोपट मुखर बने
स्वर्गसौख्य ये विटुनि धुंडिता देवांची सदने
अर्ध्या वर्षाच्यावर शिरप्या जो न पुरा झाला
तोच पालथे घालुनि खोपट बाहिरही पडला
रांगत असता वाटे भुरकुल कुरळ्या केसांचे

मधेच वळवुनि दृष्टि करितसे सिंचन अमृताचे
आवरताना तया भिमीची तिरपिट होत असे
देऊनि त्या मग व्याधाजवळी तिळभर स्तब्ध बसे
बघता त्याला मग व्याधाचा दाटुन ये कंठ
मुके घेउनी त्याचे अमृत प्राशी आकंठ
शिरप्या परि तै बापापासुन दूर दूर सरके
आणि आइला बिलगुनि ओढी केस तिचे भुरके
व्याधाचा जरि जीव मुलावर आईवर त्याच्या
प्रीत जयावर त्याचि दुजावर न्यायच जगताचा

व्याधाला मग सवड सापडे शिकारिला जाया
आणि घेउनी चाप चराचर भवते विसराया
जो न सांडते अरुणरसाची धरणीवर छाया
शिरप्या ठेवुनि आईजवळी व्याध निघे जाया
तीरकामठा स्कंधि लाविता जो निघतो नाद
तोच भारुनी अंतर त्याचे उमटवि पडसाद
तदा टाकुनी काम हातचे भिमी पदर खोवी
कडे घेउनी शिरप्याला ती पोचविण्या यावी
खोपेपुढच्या दरडीवरच्या वळणाशी येई

निरोप घे न दोघांचा मग व्याध निघुन जाई
सुरू होतसे दृष्टीपुढती आता घनराई
दिवसभरी मग व्याध तयांना दृष्टिआड होई
निरोप घेता भिमी थबकुनी व्याधाला म्हणते
" दिवसउजेडिच परतुनि ये हं वाट तुझी बघते "
माहित होती पुरती तिजला व्याधाची रीत
रिक्तहस्त नच व्याध कधीही परतुनिया येत
तरिहि ओढती तिला तयाच्या चिंतेचे पाश
फिरुनि म्हणे मग 'येइ जिवाला जपुन सावकाश'
" होय " म्हणुनिया जाउ लागता अडवोनी म्हणते
" ऐकलंस का शिरप्या म्हणतो काय काय ते ते?"
रोज तेच परि नित्य नवे ते कूजन प्रीतीचे
क्षणभर अडवुन ठेवित त्याचे वेड शिकारीचे
लटक्या रागे तिच्या गालि मग चापट हळु देई
जाता जाता चुंबुनि शिरप्या तीर जसा जाई
आणि टिपोनी घेता ओठे शिरप्याचे ओठ
भीतिप्रीतिनं येइ भिमीच्या दाटुन मग कंठ
व्याधावाचुन जग बघण्याला तिजला नच नयन
तोच एकला तिच्या कुडीतिल लखलखता प्राण

तीरकामठा प्रचंड ज्याचा होइ टणत्कार
तोच देतसे व्याधबलाचा जणु साक्षात्कार २४०
तरिहि तियेची प्रीत घेतसे पापाची शंका
वाटे अवचित येइल ना कधिमधी वक्त वाका ?
देवळातिल्या अंबेपुढती बसते जाऊन
गालावरुनि अन् ओघळती जलबिंदू दोन
" आई अंबे ! नेउ नको ग धनी कुंकवाचा २४५
त्याच्या आधी ने मज बघता दिन सौभाग्याचा
एकदाच जरि येइल त्याला कायमची नीज
देवा देवा परि काळजिनं मी मरते रोज
आई अंबे ! संपव ना ग ही यातायाती
रोज मारती कवळ्या जीवा काळजिच्या ताती "
तिची विनंती ऐकुन जणु की देवी कळवळली
शिरप्या ठेवुन आईजवळी तिज घेउन गेली
शिरप्यावरचं किंवा दैवा छत्र न पाहवलं
आइ मरुनिया म्हणुनि सानुलं हो उघडं पडलं
बाइल मरता व्याध जरी मग अंतरि बहु दुखला
शिरप्याचं परि सांत्वन करता स्वतः शांत झाला
जलवृष्टीनं तप्त जिवाला सृष्टी शांत करी

त्याच वृष्टिने आणि स्वतःही होते शांत खरी

यापरि केल्या जरी बाइली पूर्वि चारपाच
साऱ्या गेल्या एक टिके हे सानुलेच साच
सर्वांची जरि प्रीत तयाला टाकुनिया गेली
तीच येउनी शिरप्याभवती जणु केंद्रित झाली
मायतातही तोच एकला शिरप्याचा झाला
जपुनि तयाने चौवर्षाचा शिरप्या वाढविला

होती पोराकरता व्याधे माया साठविली
त्यातुन पैरण अन् सुरवारी इजार त्या केली
त्यामधि शोभे चौवर्षाचा शिरप्या सरदार
खड्ग लाकडी उपसुनि निघतो करावया वार
मुठी वळवुनी ओठ चावुनी बापा चमकावी
इजारिची परि गुंडी उघडी तशीच राहावी
हसू येतसे व्याधाला मग पाहुनि ते ध्यान
मुके घेउनी सरदाराचा करतो सन्मान
शिरप्याला ते वाटे कोडे 'हा शत्रू कैसा
खड्ग उपसता मला उचलुनी घेइ मुके ऐसा ?'
एके समयी त्याला गवसे पिल्लू मैनेचे

घारीच्या तोंडातुन पडता कळवळुनी नाचे
नव्हते त्याला फुटले पुरते पंखहि उडण्याला
तोच तयावर अवचित पडला दैवाचा घाला
पाहुनि त्याला मग व्याधाला आलीसे कीव
नेउनि जवळी शिरप्यासच तो जोपासे जीव
पाणि तयाला पाजुनि भरवी कणसाचे दाणे
दूर राहुनी शिरप्या पाही सारे नवलाने
काळगतीनं हळुहळु मैना बोलाया शिकते
हुबेहूब अन् मग व्याधाचे बोलहि उमटविते
शिरप्या होता दृष्टिआड लव सारखि ओरडते
खुणाविता ती तर व्याधाच्या बोटावर बसते
कौतुक सारे शिरप्यानेही हरखुन पाहावे
त्यासहि वाटे आपणही तिज बोटावर घ्यावे
जवळी घेण्या फारच परि त्या भीती वाटावी
बळेच तिज मग व्याध तयाच्या डोक्यावर ठेवी
तिला झटकण्या मुरडुनि माना शिरप्या जै नाचे
तदा उडुनिया करि व्याधाच्या टेकण खांद्याचे

एके दिवशी बाहिर जाई व्याध शिकारीला

शिरप्या होता खेळत बसला घेउन मैनेला
तदा आपुल्या पावलि छपुनी वनमांजर येई
झडप घालुनी ते मैनेला अन् अवचित नेई
बघता त्याच्यामागे शिरप्या किंचाळत येई
तोंडि धरुनि परि ते मैनेला झणि पळुनी जाई
संतापानं लाल जहाले शिरप्याचे गाल
गालावरुनी आणि ओघळे अश्रूंची माळ
परतुनि येता तो व्याधाला सांगे ते रडुन
वृत्त तयाला ऐकत असता आले गहिवरुन
शोक दाबुनि व्याध तयाला समजावू लागे
" रडू नको हं आपण त्याला खचित भरू रागे
किंवा जेंव्हा शिरप्या माझा मोठा होईल
त्याला मारुन मग मैनेला घेउन येईल "
अजाणतेच्या आनंदानं शिरप्या तै हसला
" मांजर मारुन खासच मैना आणिन " पुटपुटला
व्याधामागे एकसारखी भुणभुण मग लावी
" बाबा ! नेउन तुझ्याबरोबर मौज मला दावी
जाई जेंव्हा तापीवर मग जंगल तोडाया
नेइ बरोबर तै शिरप्याला समजुत काढाया .

नेता त्याला होत मनाची परि ओढाताण
आणि घालतो शिरप्याला निज कंठाची आण
"अवखळ पोरा हूडपणा निज इथे तरी टाक
पळू नको दुरि जवळि राहुनी देइ मला हाक"
मान वळवुनी ओठ जुळवुनी शिरप्या 'हो' म्हणतो
तिथेच ठेवुनि व्याध तया मग झाडावर चढतो
गवत खालते दिसे पसरले नव हिरवेचार
त्यावर उडती पिवळ्या पिवळ्या पाकोळ्या फार
शिरप्या रमतो धरता त्यांना इवल्या बोटांनी
तसा पाहता तया व्याधही जाय कामि रमुनी
कंटाळून मग शिरप्या टाकी पलीकडे नजर
हाकेवरती दिसले त्याला तापीचे तीर
तिथे खेळती हरिणपाडसे इवलीशी गोड
एक तयातिल जणू खुणविते आण तुझी मोड
टपोर काळेभोर नयन ते करि अधिकच मोठे
भुरकट काळ्या नाकपुड्याही थरथरती थाटे
शिंपल्यापरी त्या कानांची होत हालचाल
शिरप्याला त्या निमंत्रणाची फार पडे भुरळ
पडे तयाला " मग व्याधाच्या आज्ञेचा विसर

पाडस धरण्या धावत जाई आता तो दूर
हरिणपाडसहि मुग्ध विचारे इवलेसे पोर
भान कसे त्या शिरप्या अपणा धरण्या येणार
चिमणे त्याचे चपल विजेपरि सानुलेच पाय ३३५
इवल्याशा शिरप्याची त्यांना काय भीति होय
जवळ येइतो शिरप्या अतुले स्तब्ध उगा राही
बिलगणारसे दिसता झपकन् दूर उशी घेई
सहन होईना शिरप्याला तो अपुला अपमान
वाटे 'पायातिल बळ बघण्या नकोच अनमान'
शिवाशिवीचा खेळ यापरी दोघांचा चाले
गवतहि तिथले जणु आनंदे सळसळसळ हाले
कवळा करुनी दो हातांचा जै धावत जाई
पटे मनाला की व्याधच हे बालरूप घेई
हसता खुदुखुदु पळता दुडुदुडु केसहि भुरभुरती
दिसता ते व्याधाची नयने ओलावलि असती
तीरावरती येता पाडस बावरुनी जाई
शिरप्याची अन् पकड चुकविण्या पलीकडे पाही
तोच दिसे त्या लाकुडओंडा तीरावर तरता
त्यावर चढले झपकन् मग ते विचार नच करता

इवल्या वजनाने परि त्याची हालचाल होई
जलवेची त्या तीरापासुन दूरदूर नेई
शिरप्याच्या आनंदा आता नच पारावर
पूर्वीपासुनच पोहण्यात तो तर वाकबगार
काहि होय तरि ते व्याधाच्या रक्ताचे पोर
जन्मजातची साहस त्याच्या अंगी असणार
उडी टाकुनी पाण्यामध्ये सपसप ते कापी
वाचविण्याची ईर्ष्या पाडस करि त्या संतापी
दीन पाडसा बघता चित्ती कोलाहल माजे
आणि नदीच्या ओघाशी तो ईर्ष्येने झुंजे
तोच खळबळा कोणीसे त्या जळामधी शिरले
बुडताना ते असंख्य बुद्बुद पृष्ठावर आले
मागे वळता कराल जबडा दिसला सुसरीचा
प्राणि हा कधी पूर्वी नव्हता परिचित शिरप्याचा
शिरप्याला या मौज वाटली विचित्र प्राण्याची
ठाउक नव्हती क्रूर शक्ति त्या कराल सुसरीची
परि सुसरहि मग पोटि घेउनी पाणी वर आली
तिने शेपटी जळी हापटुन खळबळ उडवियली
अता भीतिने शिरप्याची मग तारांबळ उडली

उच्चस्वराने त्याने व्याधा आरोळी दिधली
आणि ओंडक्यावरिल पाडसा बिलगुनि तो राही
जीवाहुन निज आता पाडस त्यास प्यार होई
न कळे होते किंवा नव्हते मानस सुसरीला
परि मिळल्याचा दोन सावजे मोद तिथे दिसला
सर्व थांबले तिचे पूर्विचे आता थैमान
संथपणाने पुढे पुढे ती येइ सरकून
शांति परी ती पूर्वसूचना पुढिल संकटाची
सुळका मारुनि शिरप्याखाली त्यास ग्रासण्याची
यापरि पोहुनि संथपणाने खाली ती डुबली
शिरप्याने परि चाहुल येता हुलकावणि दिधली
तदा तयाला दिसल्या पुरत्या तिच्या क्रूर दाढा
आणिक कळला तिचा आपणा खाण्याचा ओढा
नव्हती त्याला पुरी कल्पना मृत्यूची आली
तरिहि नकळता त्याने व्याधा हाक पुन्हा दिधली
आर्त हाक ती मग व्याधाच्या कानावर पोचे
जलपृष्ठीची कळता अधिकच बुचकळवी बोचे
नकळत घाली तिरकमठ्याच्या कमानिला हात
आवाजाच्या रोखानं त्या आणि सुटे पळत

काहुर माजे परोपरीच्या मानसि शंकांचे
भवितव्यामधि काय वाढले नच कळता जाचे
आणि देतसे खंडोबाला मनामधी हाक
“ तूच खंडुबा आता माझ्या प्याराला राख ”
धावतधावत जो न गाठला तापीचा काठ
तोच दिसत त्या नक्ररूप जणु नशिबाचे दात
हरिणपाडसा विलगुनि दिसला शिऱ्या बावरला
हातावरती सुसर येतसे त्यास ग्रासण्याला
पाहताच ते क्षण न लागता अचूक शर सुटला
जबड्यामध्ये रुतुन खालच्या सुसरीच्या बसला
बावचळुनि मग तसेच डुबणे सुसरीला भाग
जलपृष्ठावर लाल पसरला रक्ताचा रंग
कळे न तिजला कुठुन कशी ही इजा पोचलेली
आणि म्हणुनिया अधिकच तीही चवताळुन गेली
फरशी घेउन जळी धाडकन् व्याध उडी ठोकी
‘मारण्यामधी हिला न व्हावी काहि ‘म्हणे’ बाकी’
सुसरीच्याही पाठीवरती व्याध स्वार झाला
नाकाडावर तिच्या तडाखा फरशीचा बसला
आणि कचाकच घुसता फरशी सर्वांगामधुनी

कळून चुकले सुसरीला की यम आला म्हणुनी
तदा झटापट ती त्याच्याशी खवळुनि जी देई
पूर्णपणानं चितारणे ती कुणा शक्य होई ?
पळभर होति दृष्टिआड जणु रंग जीवनाचे
क्रूद्ध श्वसन अन् ऐकु येतसे त्यामधि मृत्यूचे
वरी उसळते, घुसळुनि निघते पाणी तापीचे
घाव कचाकच ऐकू येती त्यामधि फरशीचे
लाकुडतोड्या जेवि फोडतो गुल्म लाकडाचे
तेवि फोडिले व्याधानेही शरीर सुसरीचे
जरि सुसरहि किति गरगर फिरवी तनु निज काटेरी
तिच्यावरिल परि तै व्याधाची मांड न ढळलि तरी
अंगामधुनी जरि चिळकांड्या उडती रक्ताच्या
तरी तडाखे अविरत बसती अंगी सुसरीच्या
गतप्राण मग सुसर होउनी जळामधी डुबली
रुधिरे न्हाली व्याध-मूर्ति मग तीराला आली
होते तोवर शिरप्या पाडस तीराला गेले
अक्षत त्यांना बघुनि व्याध-मन आनंदे धाले
होता शिरप्या पाडस धरुनी तै पोहत आला
आणि दाखवी तया पराक्रम बापाचा सगळा

"कसा मर्द बघ बाप" सांगतो तया जणू "माझा"
मूर्ति सान ती बघुनि निवाला व्याधाचा कलिजा
अंगावरती तसेच होते ओघळ रक्ताचे
हवेच त्यांना औषध आता सुत-आश्लेषाचे
म्हणे आरडुन " तूच खंडुबा केलिस रं खैर
राखलास रं तूच जिवाचा माझ्या आधार
" इडापिडा रं टळू खंडुबा " म्हणुनी पुटपुटुनी
बोटे मोडुनि आखेवर त्या घेई उचलोनी
पाडस पाहुनी म्हणे "हरिण ही बरी शकुनवंती
शिरप्याची करु हीच यापुढे खाशी सांगाती
हिशी खेळता मग मैनेला विसरंल हे पोर"
श्रवता तै ते माती उकरी हापटुनी खूर
" आवडला का तुला हरणी माझा हो बेत ? "
बोलुनि ऐसे तिला बरोबर घराकडे नेत
तेंव्हापासुनि गट्टी जुळली पक्की दोघांची
तोंडालाही गाल लावुनी गप्पा करण्याची

यापरि चाले शिरप्या जपता जीवन व्याधाचे
सुखदु:खांचा काला करुनी घास गिळायाचे

पोरावरच्या आशांनी कधि नभ ठेंगू वाटे
त्याच जिवाच्या काळजिनं कधि ऊर पार फाटे
प्रेम मुलाचे व्याध-जीवनी गुलाब जणु वाटे
त्याभवतीचे परि काळजिचे बोचताति काटे
सतत हळू परि दृष्टिआडची सृष्टी कुजबुजते
भूलथाप खंड्याची आता बद्धमूल होते
पाणवठ्यावर उगा गागते चंद्री कळवळुन
तिला टाकुनी नवरा गेला उठुन असा म्हणुन
हात वेळुनी त्याच्या नावे ती बोटे मोडी
सर्वांपुढती जळफळाट हा व्यक्तवुनी सोडी
लटक्या रागे खंड्या तिजशी भांडाया येई
"का ग रांडे त्याचं करतिस नाव उगा जाई ?
मीच नाहि का त्याच्यासंगे गेलो नाचाला ?
तिथं वाकडा प्रकार तिळभर मजला ना दिसला."
त्याच्यावरती चंद्री उलटुन सर्वांना म्हणते
"करुनि दाखवा खरे तुम्ही तर दिव्य जनापुढते"
सर्वांना ती इंगत चंद्रिची पूर्णपणे पटली
चंद्री खंड्या-परस्परांना पुरीपुरी मथली
पडत फळाची आज्ञा घेउन खंड्या मग उठला

वृत्त कळविण्या अन् व्याधाला माणुस धाडियला
“ का रं नाइका ! सगळे ऐसे आतुन कुरबुरती
परद्वार तू केलं म्हणुनी खोटं बोंबलती ?
मीच नाहि का तुझ्याबरोबर गेलो नाचाला ?
तिथं वाकडा प्रकार तिळभर मजला नच दिसला
चंद्रिच उलटी माझ्यासंगे भांडाया उठते
म्हणे ‘करा तर खरे तुम्ही जर दिव्य जनापुढते’
किती बोलली टोचुन टोचुन मजलागी धादा
मन कसली ही वैरिण वाटे पाडावा मुडदा
म्हणते ‘येत्या चतुर्दशीला देवकार्य येतं
श्रीतापीचं दिव्य करा जर खरे जनापुढतं’
करूच याचा पुरा एकदा सर्व सोक्षमोक्ष
दिव्यं उतरता छी थू होइल तिचि सर्वासाक्ष
खंडोबाचं दर्शन करुनी दिव्याला जाता
योग्य निवाडा करील अपुली श्रीतापीमाता ”
पुन्हा एकदा फसुनि तयानं पटकन् “ हो ” म्हटलं
बेडर त्याच्या शुद्ध जिवाला असलं भय कुठलं ?

कानी पडता श्रीतापीच्या दिव्याचा ताशा

पोळ्यावरुनी उठति जनांचा जणु की मधमाशा
आणि वेगळे प्रत्येकाच्या गुंजन तर्कांचे
चावे काढित चाले व्याधाच्या चारित्र्याचे
कुणि आश्चर्या दाखवितो निज कुणि करतो कीव
तर कोणाच्या मत्सरि जीवा येउ बघे नीव
शिरप्या दिसता सारे तिकडे रोखुनिया बघती
आणिक त्याच्याकडे पाहुनी 'चुक् चुक् चुक्' करिती
नजरा त्यांच्या पाहुन शिरप्या ओशाळुन जाई
बापाला बिलगोनी बसता होतो रडवाई
कुरवाळुनि हळु तया व्याधही धीर देत बोले
" देउ नको हं ध्यान जगामधि असेच हे चाले
शंका येता टोचि मारणे ही त्याची रीत
तुझ्या नि माझ्या शुद्ध जिवाला त्याचि नसे भीत"
शिरप्याला जरि कळे न हे जग अन् त्याची रीत
ममतेचा फिरताच पाठिवर हात शांत होत
" हास बघू तर " म्हणता व्याधे खुदकन् तो हसतो
बागडण्याला अन् बाहेरी तरतर मग जातो

चतुर्दशीची तीथ येतसे जशीजशी जवळ

सर्वांच्या हो उत्कंठेची तशि झरझर चाल
व्याधाच्या परि गांविहि नसते चिंतेची छाया
शुद्ध मनाच्या स्वास्थ्याची ती हीच असे किमया
कुठुन कळावे धूर्तांचे त्या सर्व डावपेच
कर नाही त्या डर कोठुन मग घमेंड त्या हीच
शिकार, शिरप्या हेच तयाचे सर्व विश्व होते
गोतातिल जग कुटिल तयाला मुळि माहित नव्हते
क्षणाक्षणातुन जवळ येतसे दिव्याचा काळ
शिंग वाजले जवळी येता ठरलेली वेळ
जेवि अश्विनामधे सकाळी दव ओंब्यावरती
पडता त्या आनंदे जणु की थरकत शिरशिरती
तेवि ऐकता शिंग गोतही कुतूहले हलला
तापिनदीच्या तीरावरती आणि जमा झाला
कुणि गुंडाळित गडबडिने निज डोइस मुंडासे
देवकार्य बघण्यास आजचे येई उल्हासे
तसेच होते कुतुहलाचे देवकार्य आज
आज निवाडा होउन ठरणे व्याधाची लाज
सत्यदेव पुजुनीया आधी दिव्याला जाता
योग्य निवाडा करील अपुली श्रीतापीमाता

ठरेल जाणे किंवा टिकणे व्याधाची लाज
गोत करुनिया दिव्य तापिचं करील ते काज
आज घरातिल झटपट सरते सर्व कामकाज
थाळी घालुनि अन्नाखाली जी ति निघे आज
कडे शेंबडी पोरे धरुनी सावरुनी पदर
बाया येती त्यांचिहि असते दिव्यावर नजर
उन्हे जोवरी सरकत सरकत डोईवर आली
तोवरि बघण्या दिव्य कितीतरि जनजत्रा जमली
वाळूवरती अधिक कालवा माजे सर्वांचा
मुंडाशांच्या लुगड्यांच्याही विचित्र रंगाचा
त्यातच बामण येउन त्यानं सत्यदेव पुजिला
प्रपंच पुढचा तसा क्रमानं आणि सुरू झाला
म्हसरू मारुन त्या रक्ताचा देविस बळि दिधला
मासाचा अन् घास सर्वही हडुत्याला मिळला
काळ्याच्या तै अंगामध्ये जरिमरि संचरली
देवीच्या नावाने त्याने आरोळी दिधली
शिरप्या बापाला बिलगोनी दूर उभा राही
कुतूहलाने आणि तेथली सर्व मजा पाही
कडकडीतशा तेलामाजी तूपगूळ शिजला

हात घालतो कढइत काळ्या प्रसाद देण्याला
प्रसाद घेण्या काळ्याभवती मग गर्दी उडली
शिरप्याचीही स्वारि तेधवा कढइजवळि पळली
व्याधहि पोरा धरुनी आला प्रसाद घेण्याला
शिरप्यानंही तदा चिमकुला हात पुढं केला
खिळल्या तै मग व्याधावरती सर्वांच्या नजरा
चाले कुजबुज " नाइक येतो घेऊन निज पोरा "
कढईवरती चुकुनि तयाची सावलि परि पडली
तवा आपसामधी जातिची मंडळि चुळबुळली
खंड्या तेंव्हा फणकाऱ्यानं खोट्या तणतणला
" साल्यांनो नच नाइक माझा अजून कडू ठरला "
तोच आजच्या दिव्याची मग वेळ जवळ आली
आणि वाजली टण टण टण टण काशाची थाळी
जेवि खवळता तुफान दर्या खलाशि घाबरती
वरुणावर तेलाच्या कढया अर्पुन भिरकविती
आणि पसरता तेल समिंदर जेवि होत शांत
तेवि ऐकता टोल गलबला पूर्ण शांत होत
पंच तेधवा खड्या सुरानं सर्वांना सांगे ५६०
" गहिनाजी बिन रक्माजीच्या दिव्या व्हा जागे

मैतर त्याचा असेल त्यानं अता पुढं यावं'
दिव्य उतरण्या गहिनाजीचं अन् बळ बांधावं
तापिआइच्या वाळूवरती दोन डांब पुरले
सातच बांबू अंतर त्यामधि मोजुनिया धरले
तसे आणखी दोघांनीही अता पुढं यावं
उभे राहुनी डांबाजवळी आइस प्रार्थावं
गहिनाजीनं येउन एकाजवळि उभे असणे
मैतर त्याचा असेल त्यानं जळामधी जाणे
गहिनाजीनं आइ प्रार्थुनी एकाला शिवणे
आइ प्रार्थुनी मग मित्रानं जळामधी डुबणे
गहिनाजीनं तेथुन निघुनी दुसऱ्याला शिवणे
त्याच पावली परतुनिया मग पूर्वस्थळी येणे
तोवर जरि मग मैतर राहिल जळामधी डुबुनी
करील आई गहिनाजीचा न्याय शुद्ध म्हणुनी
दिव्यामध्ये जरि गहिनाजी ठरेल परि खोटा
रीतिप्रमाणं शासन होईल विलंब नच मिळता"
सर्वांना ते ठाउक पुरते शासन गोताचे
कान कापुनी तया जातितुन पार उठवण्याचे
कितिक आजवर होउन गेली अशी देवकार्ये

कार्य आजचे खचित परंतु सर्वांहुन न्यारे
कितीजणांना असेच शासन व्याधाने केले
होइल कैसे त्याच्याच जरी हे नशिबी आले ?
कोणाच्या हा मनी न मावे दैवाचा घाव
वाटे कुणि हा मित्र म्हणुनिया खेळावा डाव ?
गोतातिल तै मंडळि यापरि उगाच राहियली
मित्र म्हणुनि खंडयाची स्वारी तदा पुढे झाली
व्याधानेहि तया आपली संमति दर्शविली
दिव्य उतरण्या पहिली अडचण अता दूर झाली
जवान दोघे आनंदानं तसे पुढे येती ५९०
स्तब्ध राहुनि डांबाजवळी आणि उभे असती
प्रत्येकाचे नयन भासती दिव्यावर खिळले
मन्त्रमुग्धसे कुतूहलाने आसमंत भरले
कुतूहलाने तेंव्हा भासे वाराही पडला
आणि जवळच्या फक्त तापिचा घोष ऐकु आला
जीवननद तो तसाच चाले मार्गे आक्रमीत
सुखदु:खांची मनुजाच्या त्या तिळहि नसे भ्रांत
छाति काढुनी संथपणानं व्याध पुढे आला
जवळि येउनी त्याने सर्वां रामराम केला

सर्वांना तै त्याची दिसली गंभीरा मुद्रा
आणि पसरली निर्भयतेची तोंडावर तंद्रा
जेवि मनोरा वाळूमधला दिसे बांधलेला
तेवि व्याधहि वाळूवरती उभा ठाकलेला
आणि गिधाडे येउनी बसती जेवी त्याभवती
गोतातिल परि मंडळि तेवी बसलेली दिसती
व्याध येउनी जेंव्हा त्यानं रामराम केला
खंड्या तेंव्हा मैतर म्हणुनी जळामधी गेला
पहिल्याला स्पर्शताच खंड्या नदीमधी डुबला
‘अता नाइका सूड उगवतो’, मनामधी म्हणला
सुरू जाहली व्याधासंगे दिव्याची चाल
क्षणाक्षणातुन जवळ येतसे पूर्तीची वेळ
प्रत्येकाच्या सारखि बदले मुखावरिल छाया
कुणाकुणाला ठाऊक नव्हती खंड्याची किमया
कुणि प्रार्थियती खंडोबाला जरिमरि कुणि स्तविती
नयन मिटोनी कुणि अंबेला एकचित्त ध्याती
जणु खुळखुळवी दैव धरुनिया हातामधि फासे
भीति वाटते प्रत्येकाला होइल काय कसे ?
मित्रांना तै भीति वाटते ठरेल व्याध कडू

कार्य आजचे खचित परंतु सर्वांहुन न्यारे
कितीजणांना असेच शासन व्याधाने केले
होइल कैसे त्याच्याच जरी हे नशिबी आले ?
कोणाच्या हा मनी न मावे दैवाचा घाव
वाटे कुणि हा मित्र म्हणुनिया खेळावा डाव ?
गोतातिल ते मंडळि यापरि उगाच राहियली
मित्र म्हणुनि खंडयाची स्वारी तदा पुढे झाली
व्याधानेहि तया आपली संमति दर्शविली
दिव्य उतरण्या पहिली अडचण अता दूर झाली
जवान दोघे आनंदानं तसे पुढे येती
स्तब्ध राहुनि डांबाजवळी आणि उभे असती
प्रत्येकाचे नयन भासती दिव्यावर खिळले
मन्त्रमुग्धसे कुतूहलाने आसमंत भरले
कुतूहलाने तेंव्हा भासे वाराही पडला
आणि जवळच्या फक्त तापिचा घोष ऐकु आला
जीवननद तो तसाच चाले मार्ग आक्रमीत
सुखदु:खांची मनुजाच्या त्या तिळहि नसे भ्रांत
छाति काढुनी संथपणानं व्याध पुढे आला
जवळि येउनी त्याने सर्वां रामराम केला

सर्वांना तै त्याची दिसली गंभीरा मुद्रा
आणि पसरली निर्भयतेची तोंडावर तंद्रा
जेवि मनोरा वाळूमधला दिसे बांधलेला
तेवि व्याधहि वाळूवरती उभा ठाकलेला
आणि गिधाडे येउनी बसता जेवी त्याभवती
गोतातिल परि मंडळि तेवी बसलेली दिसती
व्याध येउनी जेंव्हा त्यानं रामराम केला
खंड्या तेंव्हा मैतर म्हणुनी जळामधी गेला
पहिल्याला स्पर्शताच खंड्या नदीमधी डुबला
'अता नाइका सूड उगवतो', मनामधी म्हणला
सुरू जाहली व्याधासंगे दिव्याची चाल
क्षणाक्षणातुन जवळ येतसे पूर्तीची वेळ
प्रत्येकाच्या सारखि बदले मुखावरिल छाया
कुणाकुणाला ठाऊक नव्हती खंड्याची किमया
कुणि प्रार्थियती खंडोबाला जरिमरि कुणि स्तविती
नयन मिटोनी कुणि अंबेला एकचित्त ध्याती
जणु खुळखुळवी दैव धरुनिया हातामधि फासे
भीति वाटते प्रत्येकाला होइल काय कसे ?
मित्रांना तै भीति वाटते ठरेल व्याध कडू

'ठरेल ना हा गोड ?' म्हणुनिया शत्रुस येइ रडू
जशि आवर्ती गरगर फिरते काडी गवताची
भवितव्यावर तेवि भिरभिरे आशा सर्वांची
दिव्य जणू की व्याध-जीवनी चावीचा दगड
ठरेल त्यावरि आयुष्याच्या कमानिची चाड
व्याध चालला संथपणानं दुसऱ्या शिवण्याला
त्याला शिवुनी आणि निघाला परतुन येण्याला
आता अवघं अंतर उरलं कदम पाचसात
उत्कंठा मग सर्वां ओढी जणु धरुनी हात
प्रत्येकाने श्वास आपुला जणु कोंडुन धरला
प्राण आणुनी नयनामध्ये बघण्याला बसला
शिरप्याला जरि पुरी न कळली दिव्याची रीत
हनुवट ठेवुन हातावरती तोहि बसे बघत
हरिणपाडसहि मुके बिचारे किति जरि अज्ञान
तेहि पाहते प्रकार सारा टवकारुन कान
होत नदीच्या पृष्ठावरती हालचाल तोच
कळे न किंवा काय लागली नशिबाला बोच !
आणि गलबला जोराचा मग गोतामधि झाला
खंड्याच न का धापा टाकित आता वर आला ?

दमदार म्हणुनि प्रसिद्ध होता जरि तो अडदांड
वरुनि दाखवी तरि दमलेले लालबुंद तोंड
हिरमुसल्यापरि मुद्रा करुनी थरथरवी पाय ६४०
म्हणे "निघेना दम आणिक त्या माझा निरुपाय"
आणि म्हणे मग "कसा निवाडा होईल हा खोटा
ठरेल कैसा तापिदेचि या निर्णय वांझोटा ?
किती मूर्ख मी याच्या सोंगा पुरापुरा फसलो
याचि घेउनी कड चंद्रीशी अन् भांडत बसलो
असेल काहीतरी पूर्विचे याचे बदकर्म
चंद्रीने ते अचुक हेरले याच्यातिल मर्म
उगीच कैशी भांडल याशी चंद्री गुणवंत ?
कसे ठाउकी अपणा सारे हे आतिल आत
कितितरि वर्षे नांदलि याच्यास्तव चंद्राबाई ६५०
पिकल्यावाचुनि कधी जगामधि विकायचे नाही"
आणिक पुष्कळ गरळ ओकली खंड्याची जिभली
बडबड श्रवता त्याची व्याधा शिसारि परि आली
आणि म्हणे त्या "सापा ! अपुली बंद करी वाचा
मानस नाही तुला हलकटा शिव्याहि देण्याचा
पहा चालला पोरा घेउन आता मी दूर

गोताबाहिर कितितरि उरली सृष्टी चौफेर
जाइन तेथे लाथ मारुनी पाणी काढीन
खुशाल भांडा आपसामधी मत्सर झोकून
कशा हवी मज तुमची सारी ही रांजणहंडी
गारुडि धरुनी तुझ्यासारखे साप जीत कोंडी ?
स्वैर चालुदे तिच्यात अपुली आता फुसफूस
येइल कधितरि तसेच तुम्हा खाण्या मुंगूस ”
खंड्या बोले “ इतक्यात कसा जासि इथुन दूर ?
अजून येथिल उरले आहे देवकार्य फार
अजून उरले मिरवायाचे गुलाल फासून
आणि राहिले कद्रूपणची करण्याचे खूण ”
मित्र तेधवा उद्वेगानं जाति दूर तिथुन
शत्रूंच्या अन् नयनी चढला सूडाचा खून
आणि मजेने त्रयस्थ बघती व्याधाची धिंड
कुठुनि असावी त्यांना याच्या अब्रूची चाड ?
डोईवर मग त्याच्या देती गुलाल उधळून
चंद्रीसंगे खंड्या बघतो सर्व हसत दुरुन
थाळि पिटोनि मग उद्देशुन सर्वांना म्हणती
“ बदफैल्याला असेच होईल शासन कडक अती”

शिरप्याला जरि पुरी न कळली गोताची रीत
कळता बापा इजा काहितरि तोहि जवळ येत
मुसमुसुनी पैरणीस टिपतो सुजलेले डोळे
म्हणतो "का रे तुला बोलती वाइट हे सगळे ?"
विळखा घालुन पायाभवती बापाच्या बसतो
"बाबा सांग मला ना सारे" म्हणुनि मुसमुसतो
"कशापायि हा डोईवरती गुलाल उधळिती?
कशापायि अन् असे मजकडे रोखुनिया बघती ?"
अवचित तैसा तो आईच्या आठवणी काढी
अपमानाहुन परि ती ममता व्याधहृदय फाडी
हंबरडा मग फोडुनि पोरा उरी धरुनी बसतो
"पोरा नेती कान चिराया माझा" आरडतो
बोले "सारी अशीच स्पर्धा विषारि ही इथली
तिनंच माझ्या प्यार पाखरा अँशी जखम केली
तुझ्या आइला इथली कटकट मुळी न मानवली
म्हणुनि काढुनी तिज देवानं इथुन दूर नेली
चल जाउचया आपण येथुन आइस भेटाया
हरणी घेऊ तैशि बरोबर तुजशी खेळाया"
रडतारडता मधेच शिरप्या ऐकुन ते हसला

हरणीजवळी जाउन आता बिलगोनी बसला
खांद्यावरती त्याच्या घासे हरणीही मान
तिच्याहि नयनी टपोर येती जलबिंदू दोन
बाया येउन मग त्या भवती कुरवाळीत बसल्या
खाऊ देउन त्याला त्यांनी रिझवुन पाहियला
डोळा चुकवून मग पंचानं व्याध दूर केला
गुरासारखा चरचर त्याचा कान कापियेला
कान कापता जरी वेदना व्याधा होत अती
त्याहुन परि शत्रूंचे खोटे फुंकर चुरचुरती
रक्त सांडले वाळूवरले धुवून जाईल
कशी मनाची जखम परी ही भरून येईल ?
ज्यांत आजवर स्वैर हिंडला मिरवित अभिमान
तिथेच फिरणे अता खालती घालुनिया मान
फिरून वाटे 'कशास यांचे तोंड अता बघणे
शिरप्या चढवुनि कीर्तिशिखरि मग जगातुनी जाणे
तेहि उद्याचे समाधान परि आज तरि तुटले
पोर आरडत व्याधा धुंडित येताना दिसले
सिंहिणीस की जसे दिसावे पिल्लू दुखलेले
दुःख विसरुनी पिल्लामागे तीहि जेवि पळे

त्यापरि विसरुनि दुःख आपुले व्याध पळत गेला
आणि तयाने गाढ उराशी शिरप्या मग धरिला
"पोरा" म्हणुनी उचलुनि धरता हातहि थरथरले
आणि मुक्यांनी कढ हृदयाचें तयास सांगितले
शिरप्या रडता पाहुन हरणी मूक रुदन करिते
अश्रु ढाळुनी वाळु तेथली कितितरि भिजवियते
पाहुनिया तो प्रसंग सारी चराचरे रडती
मनातुनी खंड्याला सारे शिव्या मोजताती
परी म्हणावा कुणी उठोनी खंड्याला खोटा ?
कुणी करावा तापिदेविचा निर्णय वांझोटा ?
निरुपायाने सारे माना खाली घालिताती
आणि हळुहळु तेथुन सगळे निघोनिया जाती
तोच सासरा येऊन त्याने बाजुस विनवियले
"गाडि आणली त्यात बसुन जा विंध्याद्रित सगळे
शिरप्या हरणी आणिक तुम्ही मिळून जा बसुन
योग्य ठिकाणी माणुस तुम्हा घेइल उतरून"
शिरप्या घेऊन गाडि धावता विचारहि पळती
सूडानं गोताच्या दोन्ही ओठहि थरथरती
मनात येते 'काय कुणाचा केला दुस्वास

म्हणूनि माझ्या ओठी आला दुःखाचा घास ?
केलि काय मी चुकुनि कधितरी चोरी शिंदळकी
म्हणून यातायात येतसे नशिबाला इतकी ?'
विचार करता अधिकच वाढे डोक्याचा ताप
'शुद्ध जिवाचे' वाटे 'ठरते भोळेपण पाप
पाप ओळखुन ठेचुन त्याला जो राहि संत
कालिया-मर्दन करणारा तो तर भगवंत'
आणिक पुढचे स्मृति-चक्राचे भिरभिरले आरे
शिरप्यासंगे त्यास सोडती एकलेच सारे
आणि दिसे त्या खोपट अपुले विंध्यातिल सान
ज्यात बागडे हरणीसंगे शिरप्या हरखून
होते वेष्टित गिरिराजींमधि ते चुकलेमुकले
टेकाडांवर जणु खुरमांड्या घालुनिया बसले
ओळ करुनिया त्याच्याभवती माजे निवडुंग
रसरशीत परि वरुनि दावितो काटेरी अंग
आणिक वरती अविरत धरिती आम्रतरू छाया
कळकामधुनी दूरवरोनी ऐकु येति सनया
झरा वाहुनि खळखळ खळखळ त्यास करी साथ
कुणालाहि ते मोहुन टाकी निसर्ग-संगीत

इथेच खेळत शैशव सारे शिरप्याचे चाले
जणु रानींचे कोमल सुंदर फूल दिसे फुलले
मुळापासुनच वृत्ति तयाची शिकारिला वेडी
विंधुनि बोंडे निवडुंगांची लाल रक्त काढी
होति सानुली बाण-धनुकली व्याधाने दिधली
हरणीसंगे तीच पुरेशी करमणूक झाली
उभी राहते डोळ्यापुढती अता तीच मूर्त
स्वप्न-माधुरी त्याची चाखत व्याध बसे बघत
वाटे 'गेलो उठुन जातितुन हेच बेस झालं
अवमानाचं जिणं आपणा नसतं मानवलं
गोतामधली माया खोटि पुरं तिचा नाद
पोरा ! तुजला लाविन नुसत्या शिकारिचा छंद
नको नको रं शिरप्या लागू प्रीतीच्या नादी
तीच फसविते सरळ जिवाला आणुनिया धुंदी'
अठवणि येता परि प्रीतीच्या अंतर थरथरते
उभी राहती डोळ्यापुढती सारी गतचित्रे
सई, भिमी अन् मैना पाहुन मनामधी येते
'प्रीत अंतरा चटका लावुन निघोनिया जाते'
जणू सुखाची मदिरा गेली हवेमधी उडुन

आणि राहिली चंद्री खंड्या घात करुन टिकुन
तू ही का रं असाच शिरप्या ! जाशिल सोडून ?
कल्पनाहि परि ती व्याधाला होईना सहन
झटकन् त्याने मनावेगळा विचार तो केला
पोरावरच्या ममतेनं मग कंठ भरुनि आला
'किती किती हो पोर सानुलं माझं गुणवंत
एकदाहि नच रडुन आरडुन करीत आकांत
इथं येउनी दो वर्षांचा काळ होत आला
तवापासुनी बाण धनुकली हाच तुला चाळा
कितिदा म्हणशी 'बाबा ! मजला शिकारिला ने ना!'
काय करू परि मन घाबरतं शंकांनी नाना
काय करू रं तूच जिवाचा माझा आधार
सरदारा ! तू वाटसि मजला जिवाहुनी प्यार
अपुल्या ज्वानीमधी तुझा रं बाप शूर होता
बरोबरी ना त्याची अजुनी शिकारीत आता
अपुल्या ज्वानीमधी तूच परि सवाइ होशील
कौतुक ते मग पाहुनि माझं डोळं मिटतील'

व्याध रंगला आता पुरेसा स्वप्नांच्या जाळी

तीरकामठा गळत तरी त्या शुद्ध कुठे उरली ?
आत्मकोपगत सुरवंटापरि तरंगती डोळे
आशास्वप्नी जणू मदिरमन सुरकुटुनी पडले
तोच जाळितुन शार्दूलाचे भिरभिरले नेत्र
उडाली त्याने व्याधाच्या मनि धांदल क्षणमात्र
खडबडुनी तो तीरकामठा सज्ज करी फिरुनी
हाय परी तो तेवढ्यामधी वाघ जाय निघुनी
आजवरीच्या दर्पाला जणु फटकारा बसला
फण्यावरिल मणि नागाच्या कुणि काढू पाहियला ?
कुणि सिंहाच्या आयाळीला घालु बघे हात ?
व्याध तर अता संतापानं नुसता थरथरत
म्हणे स्वतःशी 'हाच काय मी शिरप्याचा बाप
बघता ज्याला शिकारीत हो सर्वा थरकाप ?'
'हाच काय मी' म्हणे 'मनाशी शिकारी पट्टीचा
ज्याच्या हातुनि वाघ येऊनी जिवे सुटायाचा ?'
मुंडाशाचे सगळे वेढे कचकुन आवळले
रक्त शिरतिल भालावरल्या तटातटा फुगले
पुन्हा नीट मग तिरकमठ्याची दोरी बांधियली
काचा कसुनी जाळीमधुनी उडि झोकुन दिधली

चढली पुरती डोळयावरती सूडाची धुंद
फिरे वणवणा येइल जेथे वाघाचा गंध
फांद्या जरि किती हात पसरुनी त्या अडव्या आल्या
अंग चोरुनी त्यातुन त्याने मार्ग काढियेला
पाचोळयातुन काटेऱ्यातुन भुजंग फुसफुसती
कशाकशाची तमाहि परि ती व्याधाला नव्हती
सर्व घालितो गुहा नि राने मग पायाखाली
कुठेहि जातो चाहुल लव जरि वाघाची आली
म्हणे ‘ मारतो तुला खास मी फाडुन आभाळ ’
वाघापाठी आता हिंडे तो रानोमाळ
प्रभातिचा तो सूर्य अता जरि डोईवर आला
प्रखर करांनी तरिहि धुंदितुन व्याध न जागविला
अंगामधुनी जरी चालल्या घामाच्या धारा
भान नुरे त्या काढण्यामधी वाघाचा थारा
अखेरीस परि आता त्याचे कष्ट फळा आले
दूरवरी वाघाचे डोळे झऱ्यावरी दिसले
संथपणानं पाणी चाटी लपलपल जिभली
हळूच पाही चाहुल ना की हरणांची आली
भकास पोटामागिल शेपुट ताठर वळवळते

'जलपानास्तव येइल का कुणि येथ ?' म्हणुनि वदते
पोटि न मावे अता प्राप्तिचा वाघाच्या मोद
'आलाच कि ना' गमे 'वाघ मम शरा देत साद'
क्षणैक हसले उन्मादानं शिकारिच्या डोळे
अभिमानानं शरीर तैसे गद्‌गद्‌ले सगळे
क्षण न लाविता तीरकामठा त्याने सावरला
टिपण साधण्या अचुक आपुले सू सू शर सुटला
जाता जाता कराल त्याचा लखलखला फाळ
निमिषार्धामधि काम साधिले त्याने तात्काळ
अचुक जाउनी तो वाघाच्या कुशीमधे घुसला
डरकाळुनि मग वाघ धाडकन् भुइवर कोसळला
प्राणासंगे रक्त कोथळा बाहेरी आला
अंगावरचा व्याधाने मग घाम तदा पुसला
हसे खदखदा खुशाल अन् ते हालवुनी धूड
"ये रं पठ्या कशी मोडली तुझी" म्हणे "खोड !
शेर जरी तू खराच परि मी असें सवाशेर
तिरकमठ्याच्या पुढे किती या मस्ती चालणार ?
"शाबास" म्हणे तया " खरा तू गडी भेटलास
किती दिसांनी फिटली माझी शिकारिची हौस"

वाव मारता हळूहळू मग दर्प होत शांत
आणि अता त्या स्थलकालांचे पुरे भान येत
माध्याह्नीचा सूर्य अता तो डोईवर आला
शिरण्याचाही प्राण भुकेनं असेल कळवळला
असेल किंवा शिरण्या सांगत हरणीशी गोष्टी
कशी तयाने शमेल परि जी आग उठलि पोटी ?
जाणिव येता परिस्थितीची चटकुन मग उठला
'न्यावा कसला घास मुलाला ?' मनाशी पुटपुटला
पोटि घालु रं कसला पोरा ! अता तुझ्या घास ?
खायाला तर कुचकामाचं वाघाचं मास
बोलुनि ऐसे धनू घेउनी चटकन मग उठला
वाघाचा मुडदा तै मागे तसाच राहियला
हरित तृणाचे प्रदेश सुंदर अचूक टेहळले
ससे मारुनी खायाला मग पाठिवरी नेले
आणि विंधुनी उडति पाखरे नेत तीनचार
शिरण्याला तर मास सशांचं आवडतं फार
परी परतता काहुर फिरुनी शंकाचं उठलं
'पोर आपुली अठवण काढुन नसेल ना रडलं ?'
तरीहि वाटे काहि होय तरि ते अपुले पोर

रडेल कैसे ? वृत्तिचेच ते भारी शिरजोर !’
यापरि किति जरि सारु पाहतो चिंता निज दूर
पोटामधुनी त्यास लागला पोराचा घोर
झप झप झप झप पाय उचलुनी अंतर कापितसे
देह थके परि उत्कंठेची उभारी वाढतसे

अखेर आता दिसू लागली हवी तीच खोप
जिच्याभोवती मूक उधळते सुख वारेमाप
शांत त्या स्थळी अधीर मग तो येउन जरि पोचे
अता तयाला परी तेथली शांतताच बोचे
शिरप्याच्या बोलांची कोठे येइ न चाहूल
कळे न किंवा काय दाखवी हरणीही हूल
फसवाया मज किंवा दोघे दडोनिया बसले ?
डोळा चुकवुन माझा किंवा हुदडाया गेले ?
चिडून म्हणतो ‘भलतिच ऐशी ही थट्टा कसली?’
खोपेपुढची ओल तोच त्या रक्ताची दिसली
अजुन वाळले नव्हते पुरते रक्तबिंदु तिथले
चटका बसुनी तै हृदयाला पायहि लटपटले
धीर करोनी त्याने मग जो कवाड लोटियले

दिसत सानुले डोळ्यापुढती रक्ताने न्हाले
देहामधुनी निघुनी जाया घुटमळतो प्राण
भेटुन बापा कथुनि शौर्य मग म्हणतो जाईन
" बाबा ! " म्हणता क्षीण स्वराने हसले ते डोळे
" पोरा " म्हणुनी त्यास तयाने उरीं गाढ धरिले
वात्सल्यानं म्हाताऱ्याचा गदगदला ऊर
नयनामधुनी आणि लोटला अश्रूंचा पूर
शिरप्याच्याहि उल्हासाला आलासे पूर
त्यातच वाहुन इथुन जगातुन जाऊ म्हणे दूर
बोट दाखवुन कुडाकडेला क्षीण हास्य केले
" बाबा मी मारलं तयाला " म्हणुनि मिटति डोळे
कुणा मारिले ? कोण मारि अन् याला उलटून ?
आपण मागे ऐसा याचा घात करी कोण ?
काहि न कळता अधिकच तोहि बावचळुनि जाई
मृत शिरप्याची गोंडस मुद्रा निरखोनि पाही
सोडुनिया जरि अता कुडीला दिसत प्राण गेले
हास्त मुखीचे तेज देहिचे लवहि न मालवले
त्या तेजाने मंत्रमुग्धता व्याध हळू उठला
शिरप्याने दाविल्या दिशेला बाहेरी आला

येता दिसला मरून पडला वाघाचा छावा
व्याधामागे त्यानेच असा साधियला दावा
किंवा वाटे ज्याला त्याने गाठुनिया वधिले
त्या वाघाचे खचित एकले असेल हे छकुले
आर्त दृष्टिने तो छाव्याच्या तनूकडे पाही
परिस्थितीचे चित्र बोलके पुढे उभे राही

बसला होता खेळत शिरप्या घेउन हरणीला
अवचित त्याचा परी कुणीसा मनोभंग केला
हरणी दचकुन कशाने तरी दूर पळत गेली
शिरप्याला कधि दिसली नव्हती तिची दौड तसली
'कशामुळे ही पळे?' वाटुनी जो मागे पाही
वाघरु दिसता जिवाचि त्याच्या होत लाहि लाही
त्याला वाटे 'हेच खास रे मांजर ते हेच
मैना मारुनि हरणिलाहि जे लावु बघे बोच'
सूड उगवण्या खाशी संधी चालुनिया आली
वाढुनि दोरी धनुची त्याने ओढुन पाहियली
आणि बोलतो "कुठला तू रं घुसू पाहसी येथ?
जाइ पळोनि ना तर नरडं दाबिन निमिषात"

वाघरु त्यावर हसुनि म्हणे "अग जा बे कडु पोरी !
माझ्या पंजापुढे दाविसी कसली शिरजोरी ?
बाप तुझा बघ पळुनी जाई बाहेरी दूर
ठाऊक होते खासच त्या मी येथे येणार
चवताळुनिया शिरप्या बोले " थांबवि टुरटूर
शूरवीर बापाचा मी तर शूरवीर पोर "
व्याध ओरडे " मग माझे ते जळोच शूरपण
तेच हारुनी नेत माझिया प्राणांचे प्राण "
तोच धनूला जोडुन सोडी शिरप्या जो बाण
खुब्यामधे तो बसे नेमका छाव्याच्या घुसुन
त्याने खवळुन तो शिरप्यावर येइ करुन चाल
तोच सोडितो आणि दोन शर शिरप्या तात्काळ
किंचाळे मग व्याध बघुन ते " क्रूर न मी शूर
बापाचा अभिमान ठेविसी तूच खरा शूर "
तीन शरांनी वाघरु मग ते मरणोन्मुख झाले
अंगामधुनी खूपच त्याच्या रक्त गळत गेले
मरता मरता परि शिरप्याशी ते झगडा देई
नरड्यावरती त्याच्या पंजा मारुनिया जाई
नयन मिटुनि मग पाय पसरुनी ते मरुनी पडले

पाहताच ते शिरप्याचे मन आनंदे धाले
वाटे ‘ ज्याने माझी मैना पळवुनिया नेली
त्याला मारुन पुरी तयाची खोड मोडियेली ’
वाटे ‘ जो माझ्या हरणीला पळवुनिया लावी
अशीच त्याने माझ्या हातुन शिक्षा भोगावी ’
म्हणतो “ जो बापाला माझ्या करील शब्द उणा
असेच त्याने माझ्या हातुन मुकणे स्वप्राणा”
छाव्याने परि नरडीवरती पंजा मारियला
त्यातुन आता मग रक्ताचा स्राव सुरू झाला
आणि येतसे जरि जखमेने डोळ्यावर ग्लानी
सोसुन तेहि दुःख पूर्ण तो दिसे समाधानी
डोळे लावुन तो बापाची वाट फार पाही
शौर्य सांगुनि झोपायाची त्यास होइ घाई
हृद्गत कळता छावा सोडुन व्याध आत येई
थोपटुनी त्या म्हणतो “ बाळा ! शांत करी गाई ”
परी मिळेना जबाब काही शिरप्याच्या कडुन
तदा मात्र तो वेडातुन त्या उठला खडबडुन
कळले त्याला पोर आपुल्या हातातुन गेले
सुज्ञपणचि जे येइ तयाने फिरुनी वेडविले

‘ का रं पोरा ! सोडुनि जासी बाप क्रूर अपुला ?’
हात मारुनी तोंडावर तो ढसाढसा रडला
‘ गेलास कसा तूच तरी रे पोरा सोडोनी ? ’
म्हणुनी घेतो डोके फोडुनि झिंज्या उपटोनी
तरिकामठा पार मोडुनि फेकुनिया देत
अता तयाचे सर्व मोडले जीवन संगीत
आक्रोशानं त्याच्या अख्खं रानहि दुमदुमलं
डोईवरच्या आणि अंबरा भेदुनिया गेलं
गगनभेदि आक्रोश मुके परि कळत न काळाला
मुकेच जणु की ऐकुन बसल्या कानठळ्या त्याला
‘ भेट घाडणे कुठली पोरा ? ’ कोडे त्या पडले
शहाणपण निज म्हणुनि तयाने सवेच धाडियले
सूर्यालाहि जणु तो त्याचा शोक न पाहवला
तोंड दडवुनी म्हणुनि नभी तो ढगाआड दडला
आकाशाच्या नयनातुन जे ओघळते पाणी
अटेल तेहि परी न याच्या डोळ्यांची झरणी
अजुन आरडुन पिशासारखा दणाणवी रान
अजून त्याच्या कानी घुमते दैवाचे गान
कड्यावरुनिया खालि कोसळे जे पाउसपाणी

तेहि घुमविते धो धो धो धो हीच दैववाणी
रातकिडे जी सारखि करती रानीं किरकीर
त्यातुन येती ऐकु हेच त्या दैवाचे सूर

वेड्या व्याधा ! ज्याने तव बघ दर्प दुखवियेला
त्या वाघाला ठार करुनि तू सूड खरा केला
हाय ! परी दैवाने हे तव हृदय विंधियेले
येइल का तुजजवळी परते काहि जरी केले ?

पुणे, संपूर्ण १३ ऑगस्ट १९४३.

## – स्वतःस –

Thou art but an atom. Yes ! Yet a mighty atom of the mighty universe.

हा कोण उडाला दृष्टी पुढला आता एक तुषार ?
आताच कारंजातुन उडला
कमल–दलावर अवचित पडला
लाधले लक्ष्मिचे आसन म्हणुनी पळभर
चमचमणार १

आनंदे हा अजुनि थरथरे
सांग पाहु तरि कुठला तू रे ?
तूं असाच का निज आनंदामधि येथ गढुन
बसणार ? २

जरि दिसे तव न्यारी कांती
तरी कसा तू ठरशिल मोती ?
लाधले तुला जे वैभव त्याचा ईश्वर किमयागार ३

रा.ग्रं. १२-३०



इथेच जरि तू अलग बैसशिल
रविकर तुजला शोषुन घेतिल
अन् काळ धावता काहि तुझा ना मागमूस उरणार ४

सारस्वत नद भरला पूर्ण
रसिक-सूर्य त्या शोषिल कणकण
शोषिल्या जलाचे बनुनी ढग मग इंद्रधनू दिसणार ५

चल सोडुन हे तुझे अलगपण
'त्यातलाच मी इवला कण' म्हण
क्षण दिसतिल तुजमधि विविधरसांचें विविध रंग
गुलजार ६

पुणे. ३० ऑगस्ट १९४३.

... ग्रं... ालय ठाणे
दा. क्र. १०९५४
... शाखा ...

## – उरलेसुरले –

१ छंद: प्राची मिश्र; चाल: काहीशी 'माझा मुलगा' या बोलपटातील 'जिवलगा! पाहू रे किती वाट' या गाण्यासारखी.

२ छंद: चंद्रकांत; कै. पाटणकरांच्या 'लिंबोणीच्या झाडामागे' या कवितेसारखी; 'Frozen music' या वहीत इंग्रजी भाषांतर.

३ छंद: चंद्रकांत; चाल: दुसऱ्या कवितेसारखी.

४ जाति: अंजनी; चाल: कै. गोविंदाग्रजांच्या 'अल्लड प्रेमास' या कवितेसारखी; राग—कालंगडा; ताल—केरवा.

५ छंद: स्मर; काहीसे पाश्चात्य संगीताच्या धर्तीचे सूर.

६ जाति: चंद्रकला; एका तरुण वैमानिकाच्या अपमृत्यूने मनात उसळलेल्या भावना.

७ छंद: देवद्वार;

८ जाति: नववधू; मात्र ध्रुवपदाचा दुसरा चरण कमी; राग—मिश्र पिलु; ताल—केरवा.

९ जाति: मोहिनी; चाल: 'सोड सोड आता' या गिरीश यांच्या कवितेसारखी; राग—कालंगडा; ताल—केरवा.

१० छंद देवद्वार.

११ जाति: नववधू; राग—मांड; ताल—केरवा.

१२ छंद: वनहरणी;

१३ जाति: पादाकुलक; मात्र चाल: मैथिलीशरण गुप्त यांच्या 'बार बार तू आया' या हिंदी कवितेसारखी; राग—बागेश्री; ताल—केरवा.

१४ छंद श्यामाराणी; चाल: काहीशी रा. बाबूराव गोखले यांच्या 'वारा फोफावला' या कवितेसारखी; Sylvia Townsend Warner यांच्या The Sailor या कवितेचा अनुवाद.

१५ जाति: अवनी—मिश्र; राग—पहाडी; ताल—दादरा.

१६ जाति: अंजनी; चाल: काहीशी रे. टिळक यांच्या 'पाखरा येशिल का परतून?' या कवितेसारखी; 'जगाचा इतिहास' प्रसिद्ध झाल्यानंतरची पहिलीच कविता!

१७ छंद: देवद्वार.

१८ जाति: नववधू; राग—मांड; ताल—केरवा.

१९ जाति : युवतिभूषण; चाल : कै. देवल यांच्या 'फुले वेलींची' या गाण्यासारखी; राग–मांड; ताल–केरवा.

२० जाति : पादाकुलक; राग–मिश्र मांड; ताल–दादरा.

२१ जाति : पादकुलक; राग–नंद; ताल–द्रुत एकताल.

२२ जाति : नववधू; मात्र ध्रुवपदाचा दुसरा चरण कमी, राग–मिश्र पिलु; ताल–केरवा.

२३ जाति : बालानंद–पादाकुलक, राग–मिश्र मांड; ताल–केरवा.

२४ छंद : देवद्वार.

२५ जाति : अंजनी; चाल, राग व ताल—चवथ्या कवितेप्रमाणें; 'कोळ्याचे जाळे', २५ ऑगस्ट १९४०.

२६ जाति : चंद्रकला; 'कोळयाचे जाळे', ११ सप्टेंबर १९४०.

२७ जाति : नववधू; चाल:'जन पळभर' या कै. तांबे यांच्या कवितेसारखी; कवाली.

२८ छंद : वनहरिणी.

२९ जाति : पादाकुलक; चाल—विसाव्या कवितेसारखी राग—मिश्र मांड; ताल—दादरा.

३० जाति : नृपममता; चाल—कै. गोंविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेसारखी; 'कोळ्याचे जाळे', २ जून १९४०.

३१ जाति : अंजनी; चाल, राग व ताल—चवथ्या कवितेप्रमाणे.

३२ जाति : चंद्रकांत.

३३ जाति : चंद्रकांत, मात्र शेवटले अक्षर एकमात्रिक; चाल:काहीशी 'आपले घर' या बोलपटातील 'आला श्रावण नाचत गात' या गाण्यासारखी; राग—मिश्र खमाज.

३४ जाति : अंजनी; चाल:काहीशी 'लोढु नको मज दूर कन्हैया' या गाण्यासारखी; राग—पहाडी; ताल—केरवा.

३५ छंद : वनहरिणी.

३६ वृत्त : शार्दूलविक्रीडित; सुनीत; 'कोळयाचे जाळे'.

३७ जाति : चंद्रकला; 'कोळयाचे जाळे'; ८ मे १९४०.

३८ छंद : देवद्वार.

३९ जाति : पादाकुलक, चाल, राग व ताल—विसाव्या कवितेप्रमाणे; मात्र प्रत्येक शब्दानंतर थबकत, थबकत ध्रुवपद म्हटले असता अधिक रसवाही होईल.

४० छंद : वनहरिणी.

४१ छंद : वनहरिणी.

४२ जाति : पादाकुलक, मात्र राग—पहाडी, ताल—केरवा.

४३ वृत्त : शार्दुलविक्रीडित.

४४ छंद : देवद्वार.

४५ जाति : शूर्पणखा.

४६ जाति : तुंगभद्रा, राग—पहाडी; ताल—केरवा.

४७ छंद : वनहरिणी; Eleanor Fatjeon यांच्या Ngiht passes या कवितेचा अनुवाद.

४८ जाति : विद्युल्लता.

४९ वृत्त : शार्दूलविक्रीडित; सुनीत.

५० जाति : चंद्रकांत.

देवकार्य—ओळ ९७; जमातीतील बखेड्यांचा निवाडा करण्यासाठी आणि जमातीतील कामकाजाची काहीएक संघटित रूपरेखा आखावी

म्हणून पारधी लोकं अधुनमधून एकत्र जमतात. त्यांना देवकार्ये म्हणतात.

नाहक—ओळ १००. पारध्यांच्या म्होरक्याला नाइक म्हणतात.

द.भाडे—ओळ १०६. पारध्यांमधील एक आडनांव.

अरई—ओळ ११०. पारध्यांमधील एका कुळाचे नाव.

कुंकू लावणे—ओळ ११४. पारध्यांमधील वाङ्-निश्चय-समारंभ.

शिरवंती व रुखवत—ओळ ११५. पारध्यांच्या लग्नसमारंभातील दोन पोट-समारंभ

तमाशांतल्या...हात धरुनि गेला—ओळ १७४. पारध्यांमध्ये वहुपत्नीकत्वाला मान्यता असली तरी व्यभिचार हा गुन्हा आहे.

खंडोबा—ओळ १८७. पारध्यांचे एक दैवत.

अंबा—ओळ २४६. पारध्यांची एक देवता.

हडुता—ओळ ५३७. पारधी लोक म्हशीचे मास खात नाहीत. पण म्हशीचा बळी दिला असता ते मास खाताही येत नाही व टाकूनही देता येत नाही. ही अनवस्था टाळण्यासाठी पारधी लोक ते मास 'हडोती' या बावरी जमतीतल्या एका हलक्या पोटजातीतील कोणातरी माणसास देऊन टाकतात.

जरिमरि—ओळ ५३८ पारध्यांची एक देवता.

हात घालतो...प्रसाद देण्याला—ओळ ५४३ अंगात आलेल्या माणसाने कडकडीत तेलात हात घातला तरी हाताला त्याच्या हातास अपाय होत नाही अशी पारध्यांची श्रद्धा आहे.
कढईवरती...चुळबुळली—ओळ ५५०–५१. जाति—अहिष्कृत माणसाची सावली पारधी लोक प्रसादाच्या कढईवर पडू देत नाहीत.
मैतर...मिळता—ओळ ५६१–७७ पारध्यांमधील एक दिव्य.

५१ जाति : मिश्र मनमोहन.

---

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७६६४
स्थळ प्रत

REFBK-0017964

REFBK-0017964

# — जगाचा इतिहास —

## जगाच्या इतिहासावरील मराठीतील पहिलाच ग्रंथ.

### विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय.

१ साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर—इतक्या तरुण विद्यार्थ्याने, इतक्या गंभीर विषयावर, इतके मोठे आणि इतके चांगले लिहिलेले माझ्या पाहण्यातील पहिलेच पुस्तक.

२ प्रा. दत्तो वामन पोतदार—हा तरुण लेखक सफाईदार रीतीने कलम चालविण्यात निष्णात आहे.

३ प्रा. श्रीपाद महादेव माटे—विषयाचा केवढा व्याप मनाशी धरून या विषयावर लिहिलेले मराठी भाषेंतले हे पहिलेच पुस्तक असावे.

४ डॉ. रामचंद्र नारायण दांडेकर—श्री. नातू यांचा ग्रंथ निःसंशय अपूर्व असाच आहे.

५ प्रा. राजाराम विनायक ओतुरकर—इतिहासाचे अध्ययन आपल्या देशापुरते न ठेवता ते अधिक व्यापक, अधिक सखोल व अधिक सूक्ष्म व्हावयास हवे हा सिद्धांत पटण्यास हे पुस्तक उपयोगी पडल्याशिवाय राहाणार नाही.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक .......... दि: ..........
.......... २६३ ..........